सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २२ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ३८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# यंदाच्या खरीप हंगामावर 'एल-निनो'चे सावट

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



तभा वृत्तसेवा

मुंबई : यंदाच्या खरीप हंगामावर 'एल-निनो'चे सावट असणार आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी राज्यात सरासरीच्या केवळ ८८ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असून, याचा सर्वाधिक फटका पश्र्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागांना बसेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली. सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकार सज्ज असल्याचे स्पष्ट केले.

यंदा मान्सूनचा पाऊस उतरत्या क्रमाने होईल, असा प्राथमिक अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. म्हणजेच जून महिन्यात पाऊस अधिक होईल, तर जुलै आणि ऑगस्टमध्ये त्याचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत जाईल. याशिवाय, दोन पावसांमधील खंड वाढण्याची चिंतेची बाब समोर आली आहे. पावसातील या खंडामुळे खरीप पिकांवर मोठा ताण येण्याची शक्यता आहे. हे संकट लक्षात घेता, जलयुक्त शिवार अभियानाची सर्व कामे अत्यंत जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत, जेणेकरून सुरुवातीला पडलेला पाऊस अडवून त्याचा वापर ऐन टंचाईच्या काळात पिकांना संजीवनी देण्यासाठी करता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

प्रत्येक जिल्ह्याला त्यांच्या भौगोलिक स्थितीनुसार 'एल-निनो'चे स्वतंत्र नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यापूर्वी २०१५ हे एल-निनोचे वर्ष राज्यासाठी अधिक कठीण होते; कारण त्यावर्षी मराठवाड्यात केवळ ६१ टक्केच पाऊस पडला होता, अशी आठवण सांगत मुख्यमंत्र्यांनी प्रशासन, कृषी विद्यापीठे आणि क्षेत्रीय यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश दिले. पाण्याचा महत्तम उपयोग करून कमी पाण्यात पिकांचे सायकल नीट बसवण्यावर भर दिला जाणार आहे, असेही ते म्हणाले.

- राज्यात खरिपाचे क्षेत्र हे १५२ लाख हेक्टरचे असून, यातील ८८ लाख हेक्टरवर केवळ सोयाबीन आणि कापूस असतो; तसेच ऊसदेखील मोठ्या प्रमाणात घेतला जातो. सोयाबीन, कापूस, मका, भात, तूर, बाजरी या बियाणांचा मुबलक साठा उपलब्ध आहे. राज्याला २०.१६ लाख मेट्रिक टन बियाणांची आवश्यकता असताना तब्बल २८ लाख मेट्रिक टन बियाणे उपलब्ध आहे. हे सर्व बियाणे प्रमाणित असावे आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी 'साथी' पोर्टल तयार करण्यात आले असून या पोर्टलवरील प्रमाणित बियाणेच विकत घेण्याचा आग्रह शेतकऱ्यांना केला जात आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. - खतांच्या संदर्भात ४८ लाख मेट्रिक टन आवश्यकतेपैकी २५ लाख मेट्रिक टन खत सध्या उपलब्ध आहे. यंदा जागतिक परिस्थितीमुळे खतांच्या पुरवठ्यावर ताण असणार असल्याने खतांचा वापर शेतीव्यतिरिक्त औद्योगिक गोष्टींसाठी वळवला जात आहे का, यावर सरकारचे विशेष लक्ष असेल. तसेच बनावट बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या विरोधात मोठी तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. काही ठिकाणी अनुदानित खतांसोबत विना-अनुदानित खते खरेदी करण्याची सक्ती व्यापाऱ्यांकडून केली जाते; मात्र अशी सक्ती केल्यास संबंधित विक्रेत्यांवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.

# राज ठाकरे तब्बल १८ वर्षांनंतर निर्दोष



तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना ठाणे सत्र न्यायालयाने गुरुवारी कायदेशीर दिलासा दिला. २००८ मधील बहुचर्चित रेल्वे नोकर भरती आंदोलन आणि त्यादरम्यान झालेल्या कथित चिथावणीखोर भाषण प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यातून न्यायालयाने पुराव्याअभावी राज ठाकरे यांच्यासह त्यांच्या अन्य सहकाऱ्यांची निर्दोष मुक्तता केली आहे. तब्बल १८ वर्षांनंतर या प्रकरणाचा अंतिम निकाल लागला.

२००८ मध्ये रेल्वे भरती प्रक्रियेदरम्यान कल्याण स्थानकावर परप्रांतीय, विशेषतः उत्तर भारतीय उमेदवारांना मनसे कार्यकर्त्यांकडून लक्ष्य करण्यात आले होते. या आंदोलनात रेल्वे मालमत्तेचे मोठे नुकसान झाले होते आणि या हिंसाचाराला राज ठाकरे यांनी केलेल्या कथित प्रक्षोभक भाषणांची पार्श्र्वभूमी असल्याचा ठपका ठेवत तत्कालीन सरकारने त्यांच्यावर गुन्हे दाखल केले होते; तसेच त्यांना अटकही करण्यात आली होती. या खटल्याच्या अंतिम सुनावणीच्या वेळी स्वतः राज ठाकरे न्यायालयात उपस्थित होते.

मागील सुनावणीत त्यांनी न्यायालयात आपला जबाब नोंदवताना, या गुन्ह्याशी माझा कोणताही थेट संबंध नाही आणि आंदोलनाच्या वेळी मी नाशिक येथे होतो, अशी स्पष्ट भूमिका मांडली होती.

या प्रकरणाच्या निकालपत्रात न्यायालयाने सरकारी पक्षाच्या तपासातील त्रुटींवर बोट ठेवले आहे. राज ठाकरे यांचा या गुन्ह्यातील थेट सहभाग स्पष्ट होईल किंवा त्यांच्यावर ठेवलेले आरोप सिद्ध होतील, असा एकही ठोस आणि वस्तुनिष्ठ पुरावा सरकारी पक्ष न्यायालयात सादर करू शकला नाही, असे निरीक्षण मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी नोंदवले. आरोपी घटनास्थळी उपस्थित असल्याचा किंवा त्यांनी थेट हिंसाचाराला चिथावणी दिल्याचा कोणताही पुरावा नसल्याने न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरवले.

## लाखो रुपये कॅश, १५ तोळे सोने चोरट्यांनी केले लंपास

नाशिक : शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या आणि घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसून येते आहे.यातच नाशिकच्या सुचिता नगर परिसरात चोरट्यांनी एका फ्लॅटमध्ये दरोडा टाकून लाखो रुपये आणि १५ तोळे सोने चोरून नेले आहे.

याबाबत नाशिकच्या मुंबई नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून उउद्यत च्या आधारे पोलिस आरोपींचा शोध घेत आहे

## अपघातात दोघांचा मृत्यू

मुंबई : मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कोडा कारचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ही कार लोखंडी दुभाजकाला धडकली. ही धडक इतकी भीषण होती, की लोखंडी दुभाजकाचा जाड पत्रा तुटून तो कारच्या आरपार गेला. या अपघातात दोन वृद्धांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. हा अपघात दुपारी तीनच्या सुमारास बोरगावच्या हद्दीत झाला.

## सोन्याला पुन्हा झळाळी

मुंबई :जागतिक बाजारपेठेतील घडामोडी आणि वाढत्या राजकीय तणावाचा थेट परिणाम पुन्हा एकदा भारतीय ग्राहकांवर दिसून आला आहे. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने चढ-उतार सुरू असून, मागील आठवड्यात दरात झालेल्या घसरणीमुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र हा दिलासा अल्पकाळच टिकला. सोन्याच्या दरात आज पुन्हा मोठी वाढ नोंदवली गेली असून, प्रति तोळा (१० ग्रॅम) तब्बल १,३१० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला पुन्हा एकदा झळ बसली आहे. तज्ज्ञांच्या मते, इराण आणि अमेरिकेमधील वाढता युद्धजन्य तणाव हा या दरवाढीमागील प्रमुख कारण आहे.

## नवतपा कहर करणार

नवी दिल्ली : उत्तर भारतात उन्हाळ्यात उष्मा असह्य होत असताना सुरू होतो नऊ दिवसांचा भयंकर काळ. ' नवतपा ' म्हणून ओळखला जाणाऱ्या या कालावधीत वर्षभरातील सर्वात उष्ण नऊ दिवस अनुभवायला मिळतात. उत्तर भारतात सूर्याचा दाह वाढत असताना 'नवतपा'मुळे नागरिकांचे हाल होणार आहेत. यंदा २५ मे ते २ जूनदरम्यान उत्तर भारतात नौतपा असेल.

## भागीदारीतून कौशल्य विकासाला नवे बळ मिळणार

मुंबई : नवीन युगातील उद्योग,व्यवसाय आणि कौशल्य विकासामध्ये दक्षिण कोरियाने जागतिक स्तरावर आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र व दक्षिण कोरियात झालेल्या सामंजस्य सहकार्यामुळे कोरियाचे उत्कृष्ट कौशल्य आणि प्रगत तंत्रज्ञान भारतात येईल, ज्याचा थेट फायदा भारतीय विद्यार्थ्यांना होणार आहे. या सामंज्यस कराराच्या माध्यमातून मूलभूत औद्योगिक कौशल्यांपासून ते उच्च-स्तरीय प्रगत कौशल्यांपर्यंत सर्व स्तरांवरील प्रशिक्षणावर मदत होईल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

## फोरकास्ट सिस्टम' चा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य

मुंबई : अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली 'भारत फोरकास्ट सिस्टम' चा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले असून हवामान पूर्वसूचना, स्थानिक पातळीवरील तयारी आणि समन्वित प्रतिसाद यामध्ये मोठी सुधारणा होईल. यासाठी भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (IITM²) समवेत करार महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन क्षमतेला अधिक बळकट करणारा महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे.

# इराणने करार न केल्यास अमेरिकेकडून कठोर कारवाई : ट्रम्प



वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत सुरू असलेल्या अणुकरार चर्चेबाबत पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतली आहे. त्यांनी म्हटले की, अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली असून, जर इराणने करारावर स्वाक्षरी केली नाही तर अमेरिका कठोर आणि अप्रिय पावले उचलू शकते.

व्हाइट हाऊसमधून बाहेर पडताना पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, आम्ही इराणसोबत अंतिम टप्प्यात आहोत. पुढे काय होते ते पाहू. ते करार करतील किंवा आम्हाला काही कठोर गोष्टी कराव्या लागतील. मात्र, अशी वेळ येऊ नये अशी आशा आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांचेही कौतुक केले. ते म्हणाले, नेतन्याहू तेच करतील जे मला हवे आहे. ते अतिशय चांगले व्यक्ती आहेत. हे विसरू नका की ते युद्धकाळातील पंतप्रधान होते आणि माझ्या मते इस्रायलमध्ये त्यांच्याशी योग्य वागणूक दिली जात नाही. ट्रम्प यांनी असा दावाही केला की नेतन्याहूंना त्यांच्या देशात ज्या सन्मानाचा हक्क आहे, तो मिळत नाही.

अमेरिकेच्या जुन्या लष्करी कारवायांचा उल्लेख करताना ट्रम्प म्हणाले की, व्हिएतनाम, अफगाणिस्तान आणि इराकमधील युद्धे अनेक वर्षे चालली, मात्र इराणच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. त्यांनी दावा केला की यावेळी अमेरिकेने तुलनेने कमी वेळात परिस्थिती नियंत्रणात आणली असून मोठ्या प्रमाणात नुकसान टाळले आहे.

ट्रम्प पुढे म्हणाले की, त्यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पुढील तीन वर्षांत मोठ्या घडामोडी पाहायला मिळतील. त्यांनी व्हेनेझुएला आणि इराणमधील अमेरिकेच्या कमी जीवितहानीचा उल्लेख करत सांगितले, काही युद्धांमध्ये, जसे व्हेनेझुएलामध्ये, आम्ही एकही व्यक्ती गमावली नाही आणि येथे आम्ही १३ लोक गमावले. इतर युद्धांमध्ये लाखो लोकांचा मृत्यू झाला. त्यामुळे लोकांना हे ऐकायला आवडत नाही की 'तुम्ही १३ लोक गमावले.' मी १३ लोक गमावले.विमानतळावरून बाहेर पडताना ते १३ लोक मृत्युमुखी पडले. बराक ओबामा यांनी १३ अतिशय चांगले लोक गमावले होते आणि मी त्यांच्या कुटुंबीयांना भेटलो होतो. आम्ही जे केले ते अद्भुत आहे. आम्ही त्यांना पूर्णपणे उद्ध्वस्त केले आहे. इराण उद्ध्वस्त झाले आहे. पुढील तीन वर्षांत तुम्हाला आमच्या देशासाठी मोठ्या आणि अद्भुत गोष्टी पाहायला मिळतील.

दुसरीकडे, इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियन यांनीही कठोर भूमिका घेतली आहे. त्यांनी म्हटले की दबाव आणि युद्ध हे कोणत्याही समस्येचे समाधान नाही.सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर त्यांनी लिहिले की, इराणने नेहमीच आपल्या बांधिलक्यांचा सन्मान केला असून युद्ध टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. आमच्याकडून संवादाचे सर्व मार्ग खुले आहेत. इराण नेहमीच चर्चा आणि कूटनीतीसाठी तयार आहे, मात्र जबरदस्तीने आत्मसमर्पण स्वीकारले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पुढील १५ तास धोक्याचे!

## १७ राज्यांमध्ये वादळी पाऊस, तर उत्तर भारतात उष्णतेचा कहर



वृत्तसंस्था

लखनौ : उत्तर भारतात उष्णतेची तीव्र लाट सुरू असतानाच भारतीय हवामान विभागाने (खचऊ) देशातील १७ राज्यांसाठी मोठा हवामान इशारा जारी केला आहे. पुढील १५ ते १६ तासांत पूर्व आणि ईशान्य भारतातील अनेक भागांमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, वाऱ्याचा वेग ताशी ८० ते १०० किमीपर्यंत पोहोचू शकतो. तर मात्र दुसरीकडे दिल्ली, उत्तर प्रदेश आणि राजस्थानसह अनेक राज्यांमध्ये उष्णतेचा प्रकोप कायम राहणार आहे.

येत्या २६ मे पर्यंत दिल्ली-एनसीआरमध्ये तीव्र उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. दिवसभर गरम वारे वाहतील आणि तापमान ४७ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. उत्तर प्रदेशात उष्णतेने अक्षरशः नागरिक हैराण झाले आहेत. बांदा येथे तापमान ४८.२ओउ वर पोहोचले असून, लखनौ, कानपूर, वाराणसी आणि प्रयागराजमध्ये पुढील काही दिवस तीव्र उष्णतेचा इशारा देण्यात आला आहे.

बिहारमध्ये पुढील १२ तासांत हवामान बदलण्याची शक्यता आहे. पाटणा, भागलपूर आणि मुझफ्फरपूरमध्ये मेघगर्जनेसह जोरदार पाऊस आणि वादळी वारे वाहू शकतात.राजस्थानमध्ये २६ मेपर्यंत तीव्र उष्णतेची लाट कायम राहणार असून, जयपूर, जैसलमेर, जोधपूर आणि उदयपूरमध्ये तापमान ४८ओउ पर्यंत जाण्याची शक्यता आहे. खचऊ ने रेड अलर्ट जारी केला आहे.

हिमाचल प्रदेशात २२ ते २३ मे दरम्यान पावसासह जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. तर झारखंडमध्ये रांची, जमशेदपूर आणि धनबाद येथे वादळासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पंजाबमध्ये चंदीगडसह अनेक भागांमध्ये तापमान ४५ओउ च्या आसपास पोहोचले आहे. अमृतसर, लुधियाना आणि पतियाळा येथे धुळीची वादळे आणि उष्णतेची लाट कायम राहणार आहे.

# नीट पेपर फुटी प्रकरणी लातूरच्या डॉ. मनोज शिरूरे यांना अटक



तभा वृत्तसेवा

लातूर : देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणात सीबीआयने लातूरमध्ये आणखी एक मोठी कारवाई केली आहे. लातूरमधील बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक करण्यात आली असून, त्यांनी स्वतःच्या मुलासाठी परीक्षेपूर्वी फुटलेली नीट प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा गंभीर आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. शिरुरे यांनी ही प्रश्नपत्रिका मोटेगावकर नावाच्या व्यक्तीकडून विकत घेतल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान सीबीआयने बुधवारी (२० मे) पुण्यात अनेक विद्यार्थ्यांच्या घरांवर धाडी टाकल्या होत्या. त्यानंतर रात्री उशिरा लातूरमधून डॉ. मनोज शिरुरे यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. चौकशीनंतर सीबीआयने त्यांना अटक केली आहे. डॉ. मनोज शिरुरे हे बालरोग तज्ज्ञ असून ते मूळचे लातूरचे रहिवशी आहेत. लातूरच्या जुना औसा रोड विभागात त्यांचं सिद्धिविनायक बाल रुग्णालय आहे. त्यांचं रुग्णालय चांगलं चालतं. नीट पेपरफुटीचं प्रकरण समोर आल्यानंतर गेल्या आठ दिवसापासून लातूरमध्ये सीबीआय तळ ठोकून आहे.

सीबीआयने आधी मोटेगावकरांची कसून चौकशी केली आणि त्यानंतर त्याला अटक केली. त्यानंतर त्याच्याकडून सीबीआयने असंख्य माहिती मिळवली. त्याची कडी जोडत सीबीआय डॉ. शिरुरेपर्यंत पोहोचली. सीबीआयने बुधवारी संध्याकाळी शिरुरे यांच्या रुग्णालयावर छापा टाकला. त्यानंतर त्यांची साडे चार तास कसून चौकशी केली. त्यांना उलटे सुलटे प्रश्न विचारले. त्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली देताच सीबीआयने त्यांच्या मुसक्या आवळल्या. पालकांवर होणारी ही पहिलीच कारवाई असल्याने लातूरसह अख्खा महाराष्ट्र हादरून गेला आहे.

# बंगळूरु विमानतळावर मोठा अपघात टळला!

## १७९ प्रवासी थोडक्यात बचावले




वृत्तसंस्था

बंगळुरू : दिल्लीहून बंगळूरुला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात लँडिंग करताना तांत्रिक बिघाड झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एअर इंडियाचे फ्लाइट -ख२६५१ बंगळूरु विमानतळावर लँडिंग करत असताना विमानाच्या शेपटीचा भाग (ढरळश्र डशलींळेप) धावपट्टीला घासल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर विमानतळावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

एअर इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, विमान सुरक्षितपणे उतरले असले तरी लँडिंगदरम्यान तांत्रिक अडचण निर्माण झाली. विमानाचा मागील भाग धावपट्टीला स्पर्श झाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून विमान तातडीने जमिनीवरच थांबवण्यात आले. त्या वेळी विमानात प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह एकूण १७९ जण उपस्थित होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाली नाही. घटनेनंतर विमानातील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. काही प्रवासी सुरुवातीला घाबरले होते, मात्र विमानतळ प्रशासन आणि एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणली. विमानतळावरील आपत्कालीन यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

एअर इंडियाने या घटनेनंतर संबंधित विमानाची सखोल तांत्रिक तपासणी सुरू केली आहे. एअरलाइनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, विमानाचे सर्व सुरक्षा निकष तपासल्यानंतरच ते पुन्हा सेवेत दाखल केले जाईल. प्रवाशांची सुरक्षितता हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे एअर इंडियाने आपल्या निवेदनात स्पष्ट केले.

दरम्यान, या घटनेचा परिणाम पुढील उड्डाणांवरही झाला. बंगळूरुहून दिल्लीकडे जाणारे फ्लाइट -ख२६५२ रद्द करण्यात आले. त्यामुळे अनेक प्रवाशांची गैरसोय झाली. विमान रद्द झाल्यानंतर एअर इंडियाने पर्यायी उड्डाणांची व्यवस्था करण्यास सुरुवात केली असून, काही प्रवाशांना हॉटेल आणि इतर आवश्यक सुविधा पुरवल्या जात आहेत.बंगळूरु विमानतळावर एअर इंडियाचे ग्राउंड स्टाफ आणि तांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने तैनात करण्यात आले असून, प्रवाशांना मदत करण्याचे काम सुरू आहे. घटनेनंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (ऊॠउ-) देखील या प्रकरणाची माहिती घेत असल्याचे समजते.

प्राथमिक माहितीनुसार, लँडिंगच्या वेळी हवामान, तांत्रिक बिघाड किंवा विमानाच्या कोनातील त्रुटीमुळे हा प्रकार घडला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, अधिकृत तपास अहवाल आल्यानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

या घटनेमुळे पुन्हा एकदा विमान सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला असून, प्रवाशांमध्येही काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वैमानिकाच्या सतर्कतेमुळे आणि तातडीच्या निर्णयामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे बोलले जात आहे.

# केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संस्था शेतकऱ्यांना शेतीसाठी पूरक ठरतील : मकरंद कोरडे

तभा वृत्तसेवा

सिल्लोड | केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था ,भारत सरकारच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरक ठरतील व शेतीपुरक व्यवसाय शेतातच करता येतील अशाप्रकारचे तंत्रज्ञान विकसित करण्याचे आवाहन, संस्थेच्या संशोधन सल्लागार समीतीच्या मुंबई येथे झालेल्या वार्षीक सभेत बोलताना संस्थेचे व्यवस्थापन समीती सदस्य मकरंद कोर्डे यांनी केले.




केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थाची (सिरकोट) वार्षीक सभा दि.१८ व १९ मेला मुंबईत संपन्न झाली. अध्यक्षस्थानी चेअरमन एस.एम. ईस्तीयाक (दिल्ली), सहायक महानिदेशक एम. नरसिंह ,डायरेक्टर एस.के. शुक्ला (मुंबई) यांचेसह सदस्य सचिन कुलकर्णी (बेंगलोर),वाय .जी .प्रसाद (हैद्राबाद), उमेश घाणेकर (कुरुक्षेत्र,हरीयाणा). सिरकोटचे शास्त्रज्ञ उपस्थीत होते.यावेळी बोलताना मकरंद कोर्डे पुढे म्हणाले कापुस उत्पादक आपल्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे.महाराष्ट्रासह देशातील इतर भागातील लाखो शेतकरी कापूस शेतीवर अवलंबून आहेत. परंतु आजही कापूस उत्पादनामध्ये सर्वात मोठी समस्या मजुरी, खर्च आणि वेळ यांची आहे.कापसाची पेरणी, निंदणी तसेच विशेषतः कापूस वेचणीचे काम अत्यंत श्रमसाध्य आणि खर्चीक झाले आहे. ग्रामीण भागात मजुरांची कमतरता सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत लहान आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी आधुनिक मोठ्या यंत्रसामग्रीचा उपयोग मर्यादित ठरतो, कारण ती यंत्रे अत्यंत महागडी असून मोठ्या शेतकऱ्यांसाठी व जास्तीचे क्षेत्रफळ असलेल्या शेतीसाठी अधिक उपयुक्त असतात. उपलब्ध यंत्रसामुग्री लहान शेतकऱ्यांना विकत घेणे परवडत नाहीत. त्यामुळे सिरकोटसारख्या अग्रगण्य तांत्रिक संस्थेने लहान शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून काम केले, तर शेतकऱ्यांच्या जीवनात मोठा बदल घडू शकतो.अशी यंत्रे विकसित करण्यात यावीत जी लहान शेतांमध्ये सहज वापरता येतील,ज्यांची किंमत सामान्य शेतकऱ्याला परवडणारी असेल व महिला आणि वयोवृद्ध शेतकरीसुद्धा सहज चालवू शकतील. सौर ऊर्जेवर चालणारी हलकी यंत्रे विकसित केली गेली, तर शेतकऱ्यांचा श्रम आणि खर्च दोन्ही कमी होईल.

शेतपातळीवर मूल्यवर्धन आणि जोडधंदा :

आज शेतकरी फक्त कच्चा कापूस विकतो, त्यामुळे त्याला मर्यादित नफा मिळतो. जर शेतपातळीवरच कापूस आणि पळहाटीपासून संबंधित लघुउद्योग विकसित केले गेले, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते.

कापसाच्या पळहाटीपासून बायोफ्युएल, ब्रिकेद्व आणि सेंद्रिय खत निर्मिती,कापूस कचऱ्यापासून पेपर, बोर्ड आणि हस्तकला साहित्य निर्मितीचे प्रशिक्षण दिले गेले पाहीजेत.लघु स्तरावरील जिनिंग आणि सूतनिर्मिती युनिट्स,ग्रामीण महिलांसाठी कापूस आधारित गृहउद्योग,तसेच कापूस बियांपासून तेल आणि पशुखाद्य निर्मिती तंत्रज्ञान व अर्थसहाय्य देण्याची मागणी त्यांनी केली.फक्त तंत्रज्ञान विकसित करणे पुरेसे नाही.त्याचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिक आणि स्वस्त दरात उपलब्धता तितकीच आवश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रायोगिक प्रदर्शन केंद्र तसेच मोबाईल तांत्रिक प्रशिक्षण युनिट्स स्थापन करण्यात याव्यात.जर विज्ञान आणि शेतकरी एकत्र पुढे गेले, तरच शेती समृद्ध होईल. कापूस उत्पादक शेतकरी हा केवळ उत्पादक नसून देशाच्या वस्त्रोद्योग- अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे त्याच्या समस्यांचे समाधान स्थानिक, स्वस्त आणि व्यवहार्य तंत्रज्ञानाद्वारे करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

## निरंतर कव्हरेज सुनिश्चित करणारे अनलिमिटेड रिइन्स्टेटमेंट

मुंबई : भारताची आघाडीची प्रायव्हेट जनरल इन्श्युरर बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड) 'माय हेल्थ केअर प्लॅन एज+' (एमएचसीपी एज+) नव्या प्लॅनची घोषणा केली आहे. वाढत्या आरोग्यसेवेवरील खर्चांना सामोरे जाण्यासाठी आणि अधिक लवचिकता व सानुकूलनाद्वारे स्वतःच्या खिशातून होणारा खर्च कमी करण्यासाठी या खास प्रगत, सुधारित सर्वसमावेशक हेल्थ इंडेम्निटी प्लॅनची निर्मिती करण्यात आली आहे. सध्याच्या एमएचसीपी स्कीमच्या मजबूत पायावर आधारित एमएचसीपी एज प्लस मध्ये मूलभूत हॉस्पिटलायझेशन कव्हरेज सोबत विविध पर्यायी रायडर्सचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे कस्टमरला बदलत्या आरोग्यविषयक गरजा, जीवनातील टप्पे आणि माफकता यानुसार आपली पॉलिसी सानुकूलित करता येते. या स्कीम मध्ये ₹ 5 लाखांपासून ते ₹ 5 कोटींपर्यंत इन्श्युरन्स रकमेचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच, एका पॉलिसी वर्षात इन्श्युरन्स रक्कमेची अनलिमिटेड रिइनस्टेटमेंट सुविधा दिली जाते.

## 3,995 नव्या कंपन्या 'दुबई चेंबर ऑफ कॉमर्स'मध्ये दाखल

छत्रपती संभाजीनगर – दुबई चेंबर्स अंतर्गत कार्यरत असलेल्या तीन चेंबर्सपैकी एक असलेल्या दुबई चेंबर ऑफ कॉमर्सने जाहीर केले आहे की, २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (Q1) ३,९९५ नवीन भारतीय कंपन्या चेंबरमध्ये सामील झाल्या आहेत. गुंतागुंतीच्या जागतिक व्यावसायिक वातावरणात भारत आणि दुबई यांच्यातील दृढ होत असलेल्या आर्थिक आणि व्यावसायिक संबंधांना हे अधोरेखित करते.मार्च २०२६ च्या अखेरीस दुबई चेंबर ऑफ कॉमर्सचे सक्रिय सदस्य म्हणून नोंदणीकृत असलेल्या भारतीय कंपन्यांची एकूण संख्या ८४,०८८ वर पोहोचली आहे. ही सातत्यपूर्ण वाढ, व्यवसायातील सातत्य, आंतरराष्ट्रीय विस्तार आणि दीर्घकालीन प्रगतीसाठी एक विश्वासार्ह केंद्र म्हणून भारतीय व्यवसायांचा दुबईवरील वाढता विश्वास दर्शवते.

## मिनिमली इन्वेसिव्ह पद्धतीने यशस्वी उपचार

मुंबई - : मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील हृदयरोग तज्ज्ञांनी हृदयाच्या झडपेच्या गंभीर बिघाडाने त्रस्त असलेल्या ७२ वर्षीय रुग्णावर अत्याधुनिक आणि मिनिमली इन्वेसिव्ह पद्धतीने यशस्वी उपचार केले. 'ट्रान्सकॅथेटर माइट्रल व्हॉल्व्ह-इन-व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट' या प्रक्रियेद्वारे रुग्णाच्या जुन्या खराब झालेल्या व्हॉल्व्हमध्ये नवीन व्हॉल्व्ह बसवण्यात आला.सुरुवातीला चालताना किंवा श्रम केल्यावर त्रास जाणवत होता, मात्र नंतर विश्रांती घेत असतानाही श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. रात्री अचानक धाप लागण्याचे झटके येत होते. हृदय निकामी होण्याच्या तक्रारीमुळे त्यांना अनेकदा रुग्णालयात दाखल करावे लागले होते.तपासणीत पूर्वी बसवलेला व्हॉल्व्ह खराब झाल्याचे स्पष्ट झाले. गेल्या सहा महिन्यांपासून रुग्णाला सतत धाप लागण्याचा त्रास होत होता.

## मोटोरोलाकडून मोटो जी37 पॉवर

मुंबई - मोटोरोला यी मोबाईल तंत्रज्ञानव नाविन्यतेमधील जागतिकअग्रणी आणि भारतातीलआघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज नवीन मोटो जी37 पॉवर , मोटो जी37 , आणि मोटो बड्स २ लॉंच केले आहेत. आपल्यासेगमेंटमधील सर्वात शक्तिशाली फोन म्हणूनओळखल्या जाणाऱ्या, मोटो जी37 पॉवर मध्ये या सेगमेंटमधील सर्वोत्तम 7000 एमएएच बॅटरी^, मीडियाटेक डायमेन्सिटी 6400 द्वारे समर्थितअत्यंत गतीशील 5जी परफॉर्मन्स,गोरिला® ग्लास 7आयसहसेगमेंटमधील सर्वोत्तम टिकाऊपणा, आकर्षक 120 हर्ट्झ डिस्प्ले,शानदार 50 मेगापिक्सल एआय-पॉवर्ड क्वाड-पिक्सलकॅमेरासिस्टम,आणि सर्वोत्तम ऑडिओ एक्सपिरियन्स देणारे डॉल्बी ॲटमॉस® स्टीरिओस्पीकर्स यांचासमावेश आहे, जे सर्व एका स्टायलिश वीगनलेदर डिझाइनमध्ये उपलब्ध आहे.

## शैलेश दातार साकारणार महान ऋषी वेदव्यास

सोनी सबची आगामी पौराणिक मेगाशो हस्तिनापुर के वीर महाभारताच्या जगाला पुन्हा नव्या दृष्टिकोनातून सादर करते. पांडव आणि कौरवांच्या बालपणीच्या प्रवासातून त्यांच्या अनुभवांना, नात्यांना आणि निवडींना उजाळा देत ही कथा दाखवते की ते पुढे जाऊन कोण झाले. या कथेला ज्ञान आणि अध्यात्मिक गाभा देण्यासाठी ज्येष्ठ अभिनेते शैलेश दातार वेदव्यासाची भूमिका साकारत आहेत तोच ऋषी ज्यांच्या शिकवणी आणि ज्ञान आजही पिढ्यान्‌पिढ्या मार्गदर्शन करत आहेत.

## सहकलाकारांकडून आत्मसात केलेल्या सवयी

सेटवर दीर्घकाळ एकत्र वेळ घालवल्यामुळे कलाकारांमध्ये कुटुंबासारखी जवळीक निर्माण होते. एकत्रित दिनचर्या, मजेशीर गप्पा आणि छोट्या-छोट्या सवयी हळूहळू रोजच्या आयुष्याचा भाग बनतात. सोनी सबचे कलाकार सृष्टी सिंह, इक्बाल खान, दीक्षा जोशी आणि नितीन बाबू यांनी अलीकडेच सांगितले की, सहकलाकारांसोबत काम करताना त्यांनी कोणत्या सवयी आणि गुण आत्मसात केले आहेत. सेटवर शांत राहणे, शिस्त पाळणे आणि सकारात्मकता टिकवणे अशा छोट्या गोष्टींनी त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यावर चांगला परिणाम झाला आहे.

## निसस फायनान्स ने पोर्टफोलियो को मज़बूत

मुंबई: निसस फायनान्स सर्व्हिसेस कंपनी लिमिटेड , जो भारत के प्रमुख स्ट्रक्चर्ड रिअल एस्टेट क्रेडिट फाऊंडर्स मध्ये एक आहे, ने रिअल इस्टेट स्पेशल अपॉर्च्युनिटीज फंड-I ची प्राइवेट ची ₹9 घोषणा आहे. रियलनेट व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन्स) लिमिटेड ही पूर्ण मालकी कंपनी सहायक आहे, श्री श्रीकांत परांजपे आणि श्री शशांक परांजपे ने प्रमोट केले आहे. हा प्रोजेक्ट "ब्लू रिज" का एक हिस्सा आहे, जो परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन्स) लिमिटेड द्वारा हिंजेवाड़ी फेज़ 1 में विकसित 150 एकड़ की एक टाउनशिप आहे. हे एक मिक्स-यूज़ टाउनशिप आहे, 33 निवासी टावर आहेत, जो प्रथम 6,000 से अधिक कुटुंबांना सौंपे आहेत.

## स्टार हेल्थने छत्रपती संभाजीनगरमध्ये सक्रिय आरोग्य सेवा उपक्रमासह पूर्ण केली 20 वर्षे

छत्रपती संभाजीनगर: भारतातील पहिली स्वतंत्र आरोग्य विमा कंपनी आणि स्वतंत्र आरोग्य विम्याच्या श्रेणीचे जनक असलेल्या स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने आपल्या २० वर्षांच्या उत्सवाचा भाग म्हणून छत्रपती संभाजीनगरमध्ये एका सामुदायिक पोहोच उपक्रमाचे आयोजन केले होते. ग्राहक, आरोग्य सेवा व्यावसायिक, कर्मचारी, सल्लागार आणि स्थानिक रहिवाशांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमातून, आरोग्य सेवेची पोहोच वाढवण्याप्रती आणि संपूर्ण महाराष्ट्रातील समुदायांसाठी एक विश्वासार्ह आरोग्य आणि वेलनेस भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक दृढ करण्याप्रती स्टार हेल्थची दीर्घकालीन वचनबद्धता दिसून आली. हा कार्यक्रम स्टार हेल्थच्या संपूर्ण महाराष्ट्रातील १५ शहरांमधील पोहोच मोहिमेचा एक भाग होता, ज्या अंतर्गत कंपनीने सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन केले होते.

## नवीन इंटेलिजेंट आयवेअरची पहिली झलक

छत्रपती संभाजीनगर: – सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेड आणि गुगलने आज गुगल आय/ओ २०२६ मध्ये आयवेअर भागीदार जेंटल मॉन्स्टर आणि वॉर्बी पार्कर यांच्या सहयोगाने डिझाइन केलेल्या दोन प्रीमियम मॉडेल्सची पहिली झलक दाखवत नवीन इंटेलिजेंट आयवेअरचे अनावरण केले. आयवेअर भागीदारांसह सह-निर्मित केलेले हे इंटेलिजेंट आयवेअर क्रांतिकारी एआय क्षमतांना आराम आणि शैलीसोबत एकत्र आणते, ज्यामध्ये सॅमसंगचे हार्डवेअर इंजिनिअरिंगमधील अग्रस्थान आणि गुगलचे एआय तंत्रज्ञान प्रीमियम आयवेअर डिझाइनशी जोडले गेले आहे.

### खुलताबाद तहसील कार्यालयातील जनता दरबारात

# नागरिकांच्या तक्रारीची अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन मुदतीत निकाली काढा : आ प्रशांत बंब



खुलताबाद प्रतिनिधी तहसील कार्यालय खुलताबाद जनता दरबार घेण्यात आला यात एकूण १७९ तक्रारी लेखी स्वरूपात प्राप्त झाल्या नागरिकांच्या समस्या तक्रारी लेखी स्वरूपात घेऊन त्या तात्काळ मुदतीत निकाली काढण्याचे आदेश आमदार प्रशांत बंब, यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले

याप्रसंगी तहसीदार संतोष गुट्टे, गट विकास अधिकारी प्रकाश नाईक, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत तहसील कार्यालयात तक्रार निवारण बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये शेत पानणंद रस्ते, तहसील संबंधित असलेली प्रकरणे. पंचायत समिती कार्यालय संबंधित तक्रारी ,भूमिअभिलेख. महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, वन विभाग, कृषी विभाग, या विभागाच्या संबंधित आलेल्या १७९ तक्रारी प्राप्त झाल्या असून,त्यामध्ये तहसील कार्यालय संबंधित तक्रारीचे निराकारण तहसील संबंधित चालू असलेल्या हेअरिंग बाबतीत 2 महिन्यात निराकारण करण्यात येईल. इतर विभागाच्या तक्रारींचे निराकण एक महिन्यात संबंधित विभागाला लेखी पत्र देऊन कळवण्यात येईल व त्या तक्रारींचे एक कॉफी संबंधित तक्रारदार यांना देण्यात येईल, असे आमदार प्रशांत बंब बैठकीदरम्यान सांगितले

या तक्रार निवारण बैठकीसाठी भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे, सौं प्रतीक्षा विकास कापसे, सभापती सुनीता संजय खंडागळे पंचायत समिति सदस्य दिनेश अंभोरे, योगिता बर्डे, उपनगर अध्यक्ष नवनाथ बारगळ ,शहर अध्यक्ष परसराम बारगळ, योगेश बारगळ, उमेश आवारे, विकास कापसे, सचिन पवार, अनिल कर्पे, प्रेम राठोड,अजिनाथ जाधव,संदीप निकम, उपस्तित होते

## देशव्यापी केमिस्ट बंदला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शंभर टक्के प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना (AIOCD) व महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आवाहनानुसार बुधवारी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी केमिस्ट बंदला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील औषध दुकाने पूर्णतः बंद ठेवण्यात आली असून आंदोलन शांततेत पार पडले.

बेकायदेशीर ऑनलाइन औषध विक्री, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची होम डिलिव्हरी तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्मकडून दिल्या जाणाऱ्या मोठ्या सवलतींमुळे लहान केमिस्ट व्यवसाय धोक्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. तसेच कोल्ड स्टोरेज आवश्यक असलेली औषधे योग्य तापमान नियंत्रणाशिवाय वितरित होत असल्याने रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. GSR 817(E) व GSR 220(E) या अधिसूचना तात्काळ मागे घेण्याची मागणीही करण्यात आली. सिल्लोड येथील मोर्चात आमदार तथा माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी सहभाग घेत आंदोलनास पाठिंबा दिला. दरम्यान, अत्यावश्यक सेवेसाठी औषधी भवन येथे टास्क फोर्स स्थापन करण्यात आली होती. त्यामार्फत दिवसभरात 28 रुग्णांना आवश्यक औषधांचा पुरवठा करण्यात आला.

# सोयगाव तालुका शेतकरी सहकारी दूध संघाच्या चेअरमन पदी गोपीचंद जाधव तर व्हाईस चेअरमन पदी शिवदास राजपूत यांची बिनविरोध निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ मे : सोयगाव तालुका शेतकरी सहकारी दूध संघाच्या चेअरमन पदी गोपीचंद गबरू जाधव तर व्हाईस चेअरमन पदी शिवदास लालचंद राजपूत यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी आमदार अब्दुल सत्तार तसेच इतर मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.या प्रसंगी बोलताना आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले की,सहकार क्षेत्र ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून दूध संघाच्या माध्यमातून शेतकरी हिताचे निर्णय घेऊन संस्थेची प्रगती साधावी. नव्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचा विश्वास कायम ठेवत दूध संघ अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत,असेही त्यांनी नमूद केले. यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे तसेच शिवआप्पा चोपडे,धरमसिंग चव्हाण,सलीम पठाण,शेख जावेद खालेक,फिरोज पठाण,समाधान तायडे,उमर पठाण, गंगाधर सदाशिवे,मेघराज राठोड,हमीदाबी तडवी, हाफिजाबी कदिर पठाण,सांडू तडवी,कुणाल राजपूत,गणेश खैरे,भागवत अंभोरे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



नवनिर्वाचित चेअरमन गोपीचंद जाधव व व्हाईस चेअरमन शिवदास राजपूत यांनी संघाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची ग्वाही दिली.तसेच दूध संघाशी संबंधित शेतकरी व सभासदांच्या हिताला प्राधान्य देण्यात येईल,असे सांगितले.

## अमोल जगताप यांचे कृषीभूषण अरूण सोहणी यांच्या कडून स्वागत

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ मे सोयगाव पंचायत समीती नवनियुक्त सहाय्यक गट विकास अधिकारी (B.D.O.) अमोल जगताप यांचे व माजी प्रभारी सहाय्यक गटविकास अधिकारी संतोष भालेराव यांचे शेतकरांच्या वतीने सर्वानुमते कृषीभूषण शेतकरी अरूण सोहणी यांनी स्वगत केले.याप्रसंगी गावातील शेतकरी उपस्थित होते.शेतकरी बांधवाना नव्या अधिकाऱ्यांकडून विकासकामांची चालना मिळून प्रलंबित कामे मागील लागतील आशी आशा व्यक्त केली.या वेळी पंचायत समीती अधिकारी,कर्मचारी व विविध भागातील प्रतीनिधी तसेच शेतकरीवर्ग उपस्थित होता.




# कन्नड तालुक्यात सरपंच आरक्षण सोडत जाहीर

### ४० ग्रामपंचायती सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव; तहसील कार्यालयात प्रक्रिया पार

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२१ मे - शासनाच्या निर्देशानुसार सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी कन्नड तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांच्या आरक्षण सोडतीची प्रक्रिया बुधवारी (दि.२१) तहसील कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. उपविभागीय अधिकारी संतोष गोरड,उपविभागीय अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी लता बागुल आणि तहसीलदार सारिका भगत यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडली.



जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशानुसार नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी १८ ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित करण्यात आले. तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४० ग्रामपंचायती राखीव ठेवण्यात आल्या. यावेळी उपस्थित नागरिक व लोकप्रतिनिधींसमक्ष ११ वर्षीय मुलांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.

मागास प्रवर्गासाठी पळशी खु., जळगाव घाट, सारोळा, तेलवाडी, नावडी, नाचनवेल, आडगाव (जे.), विटखेडा, वासडी,सोनवाडी,घुसूर, देभेगाव,करंजखेडा जा.,वडोद, जैतखेडा,पिशोर,कळंकी आणि पळसखेडा या ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला आहे.

तर सर्वसाधारण प्रवर्गात आडगाव पि., भोकणगाव, लोहगाव, शिरोडी, माळेगाव ठोकळ, जवखेडा बु.,दाभाडी, नागदतांडा,आंबा तांडा, जैतखेडा तांडा, औराळा, कानडगाव क., देवपुडी, पिंपरखेडा,चांभारवाडी, देवगाव रंगारी,गव्हाली, धामणी खु., औराळी, वडगाव जा., मेहगाव, खातखेडा, जामडी घाट, हिवरखेडा नां,देवपुळ, गराडा, कोळवाडी, विटा, शिवराई, टाकळी अं, सातकुंड, कोळवाडी, विटा, शिवराई, तांदुळवाडी, भारंबा तांडा.,कोळंबी पिशोर,कळंकी आणि डोंगरगाव या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

यावेळी नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे,प्रशांत काळे,,भगवान सिसोदे,सुरेश दुभाळकर, श्रीमाधव अनमाड, एकनाथ महाजन, जनार्धन भालकर आदी उपस्थित होते.

## ‘मॉंटाज’ चित्रपटाला बेस्ट फिचर फिल्म अवॉर्ड; मयुरेश राजवैद्य यांचा सन्मान

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी - फिल्म्स एज्युकेशन अँड वेलफेअर फाऊंडेशनतर्फे आयोजित रिल्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल-२०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगरचे युवा लेखक, दिग्दर्शक व अभिनेते मयुरेश राजवैद्य यांच्या ‘मॉंटाज’ या चित्रपटाला ‘बेस्ट फिचर फिल्म अवॉर्ड’ प्रदान करण्यात आला. १७ मे रोजी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे पार पडलेल्या पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान देण्यात आला.

‘मॉंटाज’ हा चित्रपट दोन तरुण मित्रांच्या जीवनावर आधारित असून समसारा प्रॉडक्शनच्या बॅनरखाली प्रीती अन्नु सिंग यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अभिनेत्री राधिका म्हात्रे हिने चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून मयुरेश राजवैद्य यांनी आपल्या वेगळ्या शैलीची ओळख निर्माण केली आहे.

या चित्रपटाचे पहिले प्रदर्शन कोलकाता येथील नंदन ऑडिटोरियममध्ये झाले होते. त्यानंतर लखनऊ, जयपूर, दिल्ली, पुणे तसेच मुंबईतील जागरण फिल्म फेस्टिव्हलमध्ये चित्रपट प्रदर्शित झाला. आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्राझील, फ्रान्स, स्वीडन, ग्रीस, जपान, रशिया, इंडोनेशिया, बांग्लादेश आणि नेपाळमधील विविध फिल्म फेस्टिव्हलमध्येही चित्रपटाचे प्रदर्शन झाले आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर / २०२६ / २०२७
कार्यालय नगर पंचायत, सोयगांव
दिनांक :- 20/05/2026

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, श्री./सौ. विद्या दिलीप सोनार, यांनी मोहल्ला नारळीबाग वार्ड क्र. 11 स.नं. मधील प्लॉट / घर क्रमांक 849/अ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : शांताराम महाले यांची जागां.
पश्चिम : सिमा दिलीप दंडगव्हाण यांची जागा,
दक्षिण : शांताराम शिनकर यांची जागा.
उत्तर : रस्ता.
आकार : पूर्व पश्चिम 16x19=301 दक्षिणोत्तर....

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.
मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगर पंचायत सोयगांव

जा.क्र./नपंसो/नामांतर / २०२६ / २०२७
कार्यालय नगर पंचायत, सोयगांव
दिनांक :- 20/05/2026

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, श्री./सौ. नवेद बाबू शाह, यांनी मोहल्ला बालाजीनगर स.नं. मधील प्लॉट / घर क्रमांक 18x19/1 त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : युनुस शहा तुराब शहा यांची जागां.
पश्चिम : गरीब शहा तुराब शहा. यांची जागा,
दक्षिण : श्री वसंत विष्णू बनकर यांची जागा.
उत्तर : अंतर्गत वहिवाट वापराचा रस्ता.
आकार : पूर्व पश्चिम 55.76 चौ.मी.
दक्षिणोत्तर 600 चौ.फु.

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.
मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगर पंचायत सोयगांव

CREDIT SAISON INDIA

**किसेत्सू सायजन फायनान्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड**
सीआयएन : U65999KA2018FTC113783
नोंदणीकृत कार्यालय: इंडीक्यूब लेक्सिंग्टन टॉवर, पहिला मजला, तवरेकेरे मेन रोड, तवरेकेरे, एस.जी. पाल्या, बेंगलुरू, कर्नाटक – ५६००२९

**शाखांचे स्थलांतर / एकत्रीकरण / विलीनीकरणासाठी सार्वजनिक सूचना**

सर्व सामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, २५ ऑगस्ट २०२६ रोजी आमची शाखा, **सध्या कारोबार ऑर्चर्ड, १अ, प्लॉट नंबर ६, केसरसिंगपुरा, पदमपुरा रोड, हॉटेल पंचवटी शेजारी, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३१००५ येथे आहे, ती पहिला मजला, उत्तर बाजू, कंडी टॉवर्स, CTS १२९९६, जालना रोड, मोंढा नाका जवळ, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद), महाराष्ट्र – ४३१००१ (नवीन पत्ता)** येथे स्थलांतरित केली जाईल. ही नवीन शाखा **२६ ऑगस्ट २०२६ पासून** पूर्णपणे कार्यान्वित होईल.

कृपया अधिक माहितीसाठी क्रेडिट सायजन इंडियाच्या अधिकृत वेबसाइट **https://creditsaison.in/** ला भेट द्या, टोल-फ्री क्रमांक १८००-१०३८-९६१ वर संपर्क साधा किंवा आपल्या जवळच्या शाखेला भेट द्या.

स्वाक्षरी/-
प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता
प्रेषा परागाश
दिनांक: २२ मे २०२६ पूर्णवेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

यूनियन बैंक ऑफ इंडिया — भारत सरकार का उपक्रम — Union Bank of India — A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला – १) जालना मुख्य शाखेकरिता – पिट्टी कॉम्प्लेक्स जवळ (पिट्टी कॉम्प्लेक्स पासून ०५ कि.मी. परिघाच्या आत) ता. जि. जालना – १७०० स्क्वे फुट (+-१०%) २) यू एम एफ बी छत्रपती संभाजीनगर शाखेकरिता – क्रांती चौकाजवळ (क्रांती चौका पासून ०७ कि.मी. परिघाच्या आत) ता. जि. छत्रपती संभाजीनगर – १७०० स्क्वे फुट (+-१०%) ३) अंबेजोगाई शाखा, अंबेजोगाई, ता. अंबेजोगाई, जि.बीड शाखेकरिता – १४०० स्क्वे फुट (+-१०%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ११/०६/२०२६ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. २२/०५/२०२६ क्षेत्रीय प्रमुख
अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४४८

**म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे ।**
**व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।**
**जैं जगा धाकुटें होईजे । तै जवळीक माझी ।।**

जीवाने सत्कार्य करुन पुण्याचा संचय वाढवावा आणि वाढविलेल्या संचयाच्या मोबदल्यात भौतीक सुखाची अपेक्षा न करता आत्म सुखाची अपेक्षा करावी, असे भगवंत सांगत आहेत. ईश्वरस्वरुप होण्यासाठी अभिमान, अहंकार सोडावा लागतो. जगतामध्ये भिन्नता पाहून कार्य केली तर ईश्वर प्राप्ती होण्याचे कारणच नाही. कारण सर्व प्राणीमात्र ईश्वराचा अंश असल्याने प्राणीमात्रात भिन्नता पाहिल्यास ईश्वरातच भिन्नता पाहिल्यासारखे होईल. प्राणीमात्रांची, रंजल्या गांजल्यांची सेवा ही अभिमान सोडून निस्वार्थ भावनेने करावी लागते, तेव्हा ती सेवा ईश्वराला आवडते. प्रत्येक देहात तो एकच परमात्मा भरुन उरला असल्याने जीवमात्रांना दु:ख देऊन नको त्या ठिकाणी ईश्वर पाहणाऱ्यांना आत्मसुख, परमात्मसुख मिळण्याचे कारण नाही. माणूस स्वत:ला अनेक कारणामुळे मोठा समजत असतो. या मोठेपणामुळे तो स्वत:ला मी-मी म्हणत असतो.



मी च्या वलयात जगणाऱ्या माणसाला परमात्म्याचे दर्शन होत नाही. ज्यांच्यात मी असतो त्याच्यात अहंकार, स्वार्थ, गर्व आपोआप उत्पन्न होतात. अहंकार, स्वार्थ, गर्व, मोहाच्या उत्पन्न होण्यामुळे सुख, समाधान, आनंद आपोआप दूर जातात. मोठेपणाच्या, मीपणाच्या तोऱ्यात जगणाऱ्यांना खऱ्या परमात्म्याची जाणीव होऊ शकत नाही. परमात्म्याची जाणीव करुन घेऊन त्याच्या जवळ जर जायचे असेल तर मी पण सोडून कसे वागावे, हे सांगतांना भगवंत म्हणाले, **म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होईजे ।तै जवळीक माझी ।।** अर्थात, श्रीमंतीचा गर्व, मोठेपणा दूर टाकून दयावा लागतो, सर्व प्रकारची विद्वत्ता जणू विसरुनच जावी लागते. तेव्हा परमात्म्याच्या जवळ जाण्याचा मार्ग सुकर होतो. साधुसंतानी त्यांच्या जीवनात स्वत:लाकडे मोठेपण घेतले नाही. म्हणूनच त्यांची कीर्ती शेकडो वर्षापासून अजरामर आहे.

सुर्यापुढे चंद्रसुध्दा फिका पडतो, तिथे काजव्याने मी पणा बाळगण्याचे कारण नसते. त्या प्रमाणे आपण मोठ-मोठ्या ज्ञानीपुढे अल्पसे असतांनाही, मलाच सर्व येते म्हणून मी ची बढाई मारु नये. परमात्मा सर्व प्राणीमात्रात भरुन उरला असलातरीही त्याचा सहजासहजी परीचय माणसाला होत नाही. कारण माणूस स्वत:चाच परिचय ख-या अर्थाने करुन घेत नाही. माणूस खोट्या मीपणात जास्त गुरफटत असतो. जोपर्यन्त माणसाला स्वत:चा परीचय होत नाही, तोपर्यन्त परमात्म्याचा परिचय होणे अवघड असते. स्वत:चा परीचय होण्यासाठी माणसाला मीपणाची डोळयावरची पट्टी प्रथम बाजुला सारावी लागते. ही पट्टी माणसाने स्वत:च तयार केली असल्याने व स्वत:च्या मनावर, डोळयावर बांधून घेतली असल्याने त्याला स्वत:ला ती पट्टी हटवणे अवघड नसते. ही पट्टी हटविण्यासाठी त्याची मानसिक तयारी होण्याची व सद्गुरुचे मार्गदर्शन लाभण्याची गरज असते. अभिमानाचा दगड गळयात बांधून आत्मसुखाच्या नदीत पोहता येत नाही. या नाशिवंत देहाला मी-मी म्हणण्याचे कारण नाही. परमात्म्याचा म्हणजे जगाचा, निसर्गाचा परीचय व्हायचा असेल तर अभिमानाची ही खोळ बाजूला सारावीच लागते. ही खोळ सारता येण्यासाठी संतसहवास, संतसाहित्याचे वाचन व आत्मानुभव आवश्यक आहे. जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार,
दि. २२ मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, शु. षष्ठी, सप्तमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- आश्लेषा (२६.०७)
योग - वृद्धि (०८.१८)
करण - गरज (१७.३८)
राहू काल : शुक्रवार
दु. १०.३० ते १२.००

दिनविशेष : ✻ आंतरराष्ट्रीय जैविकविविधता दिन
१७७२: थोर समाजसुधारक, ब्राम्हो समाजाचे संस्थापक आणि आधुनिक भारताचे जनक 'राजा राममोहन रॉय' यांचा जन्म.
१९७२: सिलोन या देशाचे नाव बदलून अधिकृतपणे 'श्रीलंका' असे करण्यात आले.
१९४८: प्रसिद्ध भारतीय अभिनेते आणि लेखक 'नेदुमुदी वेणू' यांचा जन्म.
१९५९: जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री 'मेहबूबा मुफ्ती' यांचा जन्म.

# जन आरोग्य योजनेशी अंगीकृत रुग्णालयाची एकही तक्रार येवू नये

**जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे निर्देश**

**प्रतिदिन 10 हजार कार्ड तयार करण्याच्या दिल्या सूचना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ मे-**

जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे अंगीकृत असलेले शासकीय व खाजगी असे १२३ रुग्णालये आहेत. या सर्व रुग्णालयांनी शासन निर्देशाप्रमाणे अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबासाठी निशुल्क व गुणवत्तापूर्ण आरोग्य उपचार करणे आवश्यक आहे. तरी या सर्व रुग्णालयाबाबत रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांच्याकडून उपचार, शुल्क व वैद्यकीय हलगर्जीपणा या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची एकही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या आढावा प्रसंगी जिल्हाधिकारी कार्तिकेयन बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवार, जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ, नगरपालिकेचे जिल्हा प्रशासन अधिकारी योगेश डोके यांच्यासह योजनेचे अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, प्रतिनिधी तसेच जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष हनुमंत कुंभार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, या योजनेअंतर्गत शासनाकडून प्रति कुटुंब पाच लाख रुपये प्रतिवर्षी आरोग्य संरक्षण मिळणार आहे. या अंतर्गत २७ विशेष सेवा अंतर्गत २३९९ आरोग्य उपचार उपलब्ध करून देण्यात आलेले आहे त्यामुळे अंगीकृत रुग्णालयांनी त्यांच्याकडे रुग्ण आरोग्य सेवेसाठी दाखल झाल्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ तात्काळ उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. या योजनेअंतर्गत रुग्णालयाबाबत रुग्णांच्या तक्रारी होताच कामा नयेत, अशी काळजी रुग्णालयानी घेणे आवश्यक आहे. तसेच आपण स्वतः जिल्ह्यातील कोणत्याही रुग्णालयात अचानकपणे भेट देणार असून या कालावधीत या योजनेअंतर्गत रुग्णांना व्यवस्थित उपचार न देणाऱ्या रुग्णालयावर



कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

या सर्व रुग्णालयात दर्शनी भागात योजनेविषयीच्या बोर्ड लावावा तसेच टोल फ्री क्रमांक ही लावावा. आरोग्य यंत्रणेने १२३ अधिकृत रुग्णालयापैकी ९५ ठिकाणी आरोग्यमित्र उपलब्ध केले आहेत, उर्वरित २८ ठिकाणीही तात्काळ आरोग्य मित्र नियुक्त करावेत. या योजनेत चांगले काम करणाऱ्या रुग्णालयांचे कौतुक असून रुग्णालयाच्याही काही अडचणी असतील त्याही सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत च लाभार्थ्यांचे रेशन कार्डही वेळोवेळी अपडेट झाले पाहिजे असेही त्यांनी सूचित केले.

### सोलापूर जिल्हा राज्यात अग्रेसर व्हावा

जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व महापालिकेच्या आरोग्य अधिकारी यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून या योजनेअंतर्गत प्रतिदिन दहा हजार कार्ड काढण्याचे नियोजन करावे. आपल्या जिल्ह्यात कार्ड काढण्याचे प्रमाण कमी असून त्याच्या मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली पाहिजे. ही योजना मुख्यमंत्री व प्रधानमंत्री यांच्या प्राधान्य क्रम असलेली योजना आहे. त्यामुळे या योजनेत सोलापूर जिल्हा ही अग्रेसर राहिला पाहिजे, या दृष्टीने आरोग्य यंत्रणा यांनी नियोजन करावे, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

### जिल्ह्यात १५ लाख ७५ हजार ३९९ इतके ई कार्ड जनरेट

प्रारंभी जिल्हा समन्वयक गुंजाळ यांनी योजनेविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने पोर्टलवर फेब्रुवारी मध्ये शिफ्ट झाल्याचे सांगितले. त्याप्रमाणे जिल्ह्यात ८ लाख ७३ हजार १६७ कुटुंबे असून एकूण लाभार्थी संख्या ४० लाख ९१ हजार ९९६ इतकी असल्याचे सांगून आज रोजी पर्यंत १५ लाख ७५ हजार ३९९ इतके ई कार्ड जनरेट केल्याची माहिती दिली. वय वंदना योजनेअंतर्गत सत्तर वर्षांपुढील नागरिकांचे २० हजार ९८७ ही कार्ड जनरेट केल्यास असून एकूण लाभार्थी संख्या दोन लाख ५४ हजार ६०२ असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

# सतर्क राहून तातडीने आवश्यक उपाययोजना करा : महापौर कोंड्याल

**महापालिका स्टोअरची अचानक पाहणी, रजिस्टर नोंद, सीसीटीव्ही आणि नियमित नियंत्रणासाठी सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

नुकत्याच घडलेल्या महापालिकेतील भंगार चोरी प्रकरणानंतर महापौर विनायक कोंड्याल यांनी सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्यासह सोलापूर महापालिकेच्या नगर अभियंता विभाग व अतिक्रमण विभागाच्या स्टोअरची अचानक पाहणी केली. स्टोअरच्या प्रवेशद्वारात सुरक्षा रक्षक नेमावेत. आवक-जावक रजिस्टर ठेवण्यात यावेत. येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती अधिकारी -कर्मचाऱ्यांची नावे नोंद करावी. वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवावे, अशा कडक सूचना महापौरांनी दिल्या.

महापालिकेतील स्टोअरमध्ये नुकतीच भंगार चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर महापौर कोंड्याल यांनी येथील स्टोअरची दुपारी अचानक पाहणी केली. या स्टोअर मध्ये आतील बाजूस नगर अभियंता विभागाचे तर प्रवेशद्वाराच्या लगत अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे भंगार आणि इतर साहित्य ठेवण्यात येते.



या दोन्ही विभागाची पाहणी केली. सद्यस्थितीतील नियोजनाची माहिती घेतली. या स्टोअरमधील साहित्य साठवणूक, सुरक्षा यंत्रणा, येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्ती व वाहनांची नोंद प्रणाली तसेच कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अक्कूलवार, नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महापौर कोंड्याल यांनी स्टोअरमध्ये प्रवेश करणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र मस्टर नोंद तातडीने सुरू करावी. परिसरात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांचीही स्वतंत्र नोंद ठेवण्यासाठी सक्षम व्यवस्था उभारा. नुकत्याच घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, नियमित तपासणी व अधिक प्रभावी देखरेख, वेळोवेळी जमा झालेल्या साहित्य व भंगाराची नोंद ठेवावी. संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क राहून तातडीने आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना महापौर कोंड्याल यांनी दिल्या.

### सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही तडजोड नाही

महानगरपालिकेची मालमत्ता, साहित्य व कार्यालयीन व्यवस्था ही जनतेची संपत्ती आहे. तिचे संरक्षण, योग्य देखभाल, पारदर्शक नोंद प्रणाली आणि सुरक्षा रक्षकाची नियुक्ती अत्यंत महत्त्वाची आहे. स्टोअर मध्ये सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. यापुढे अशा घटना घडू नये याची दक्षता अधिकाऱ्यांनी घ्यावी, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

# जिल्ह्यातील जप्त ४.५ कोटींच्या अंमली पदार्थांचा नाश

**ग्रामीण पोलिसांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

सोलापूर ग्रामीण पोलिसांनी जिल्ह्यातील १७ पोलीस ठाण्यांतील २९ गुन्ह्यांमधून जप्त करण्यात आलेला तब्बल ४ कोटी २८ लाख २७ हजार ६३५ रुपयांच्या अंमली पदार्थांचा नाश केला.

यामध्ये १६९७ किलो ४२९ ग्रॅम गांजा तसेच १९ किलो ६१८ ग्रॅम अफू व अफूची झाडे यांचा समावेश आहे. गांजाची किंमत ४ कोटी २४ लाख ३५ हजार २७५ रुपये आहे, तसेच अफूची झाडांची किंमत ३ लाख ९२ हजार ३६० रुपये आहे. सोलापूर तालुका, मोहोळ, कामती, मंद्रुप, वळसंग, अक्कलकोट दक्षिण, बार्शी शहर, बार्शी तालुका, वैराग, कुर्डुवाडी, करमाळा, पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण, करकंब, मंगळवेढा आणि अकलूज या पोलीस ठाण्यांतील एकूण २९ गुन्ह्यांमधील मुद्देमालाचा यात समावेश होता.

शासकीय पंच रोहन लोंढे आणि विकास थोरात, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत मुद्देमालाची पुन्हा वजन तपासणी करण्यात आली. त्यानंतर न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे यांच्या पथकाकडून नमुन्यांची तपासणी करून सदर मुद्देमाल गांजा व अफू असल्याचा अंतिम अभिप्रायानंतर महानगरपालिकेच्या भोगाव येथील कचरा डेपोमधील एस.एस. सर्व्हिसेसच्या इन्सिनरेटरमध्ये समितीच्या उपस्थितीत हा संपूर्ण मुद्देमाल जाळून नष्ट करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व पोलीस उपअधीक्षक शिरीष हुंबे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप, पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर ताटे-देशमुख, सहाय्यक फौजदार निलकंठ जाधवर, कमल बुरकुल, आबासाहेब मुंढे, हरीदास पांढरे, अनिस शेख, गणेश बांगर, अश्विनी गोटे, दिपाली जाधव, अशोक हलसगी तसेच संबंधित पोलीस ठाण्यांतील मुद्देमाल कारकून यांनी पार पाडली.



# बोगस परवान्यांचा काळा अध्याय; आता प्रशासकीय आत्मपरीक्षणाची गरज

**बांधकाम परवान्यांचे स्वतंत्र तांत्रिक, प्रशासकीय ऑडिट अत्यावश्यक**

सोलापूर महापालिकेतील ९६ बोगस बांधकाम परवान्यांचे प्रकरण हे शहराच्या प्रशासनिक व्यवस्थेतील गंभीर त्रुटींचे जिवंत उदाहरण ठरले आहे. नियम, कायदे आणि शासकीय प्रक्रियांना हरताळ फासून बांधकाम परवान्यांची अक्षरशः खिरापत वाटली गेली, बहुमजली इमारती उभ्या राहिल्या आणि अखेर शहर नियोजनासह महापालिकेच्या विश्वासार्हतेलाही मोठा धक्का बसला. आता नोटिसा, गुन्हे, चौकशी आणि पाडकामाच्या हालचाली सुरू झाल्या असल्या तरी हा विषय केवळ अनधिकृत बांधकामांच्या चौकटीत पाहून चालणार नाही. ही वेळ आहे संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेचे आत्मपरीक्षण करण्याची.

सोलापूर महापालिकेतील ९६ बोगस बांधकाम परवान्यांचे प्रकरण हे केवळ काही अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहारापुरते मर्यादित नाही; तर ते संपूर्ण प्रशासनिक यंत्रणेतील धोकादायक पोकळी उघड करणारे आहे. नियम धाब्यावर बसवून, अधिकार नसताना परवाने वाटले गेले, बहुमजली इमारती उभ्या राहिल्या, पार्किंग गिळंकृत झाले, साईड मार्जिन गायब झाले आणि शहराचा नियोजनबद्ध चेहराच विद्रूप झाला. हा प्रकार धक्कादायक असला तरी त्याहून गंभीर प्रश्न आहे. हे सर्व दोन-दोन वर्षे सुरू असताना कुणालाच कसे दिसले नाही? बनावट परवाने प्रकरणात झाकीर हुसेन नायकवाडी, श्रीकांत खानापुरे, आनंद क्षीरसागर, शिवशंकर घाटे यांची सेवा समाप्त झाली. गुन्हे दाखल करण्यात आले. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की हा संपूर्ण प्रकार अचानक घडलेला नाही. अनेक महिने, कदाचित वर्षभर सुरू असलेल्या या प्रक्रियेत संबंधित विभाग, नगररचना यंत्रणा आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांना काहीच माहिती नव्हती का? जर माहिती नव्हती, तर ते प्रशासनाचे गंभीर अपयश आहे आणि माहिती असूनही दुर्लक्ष झाले असेल, तर ती बाब अधिक चिंताजनक आहे. आज महापालिका अनधिकृत भागांवर हातोडा चालवत आहे, नोटिसा बजावत आहे, कारवाईचे वेळापत्रक जाहीर करत आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, फक्त बांधकामांवर कारवाई करून या प्रकरणाची सांगता होणार नाही. कारण इमारती उभ्या करणाऱ्यांइतकीच जबाबदारी त्या काळातील प्रशासकीय देखरेखीचीही आहे. आजही तत्कालीन नियंत्रण अधिकारी विविध पदावर कार्यरत आहेत.

या प्रकरणात लाखो रुपये गुंतवणूक केलेले नागरिक अडचणीत आले आहेत. अनेकांनी आयुष्यभराची कमाई फ्लॅट, गाळे किंवा जागांमध्ये गुंतवली. आज त्यांना नोटिसा, पाडकाम आणि न्यायालयीन लढाया यांचा सामना करावा लागत आहे. चुकीचा निर्णय कुणाचा आणि फटका कुणाला हा प्रश्न शहरवासीयांना अस्वस्थ करणारा आहे. शहरातील संशयास्पद बांधकाम परवान्यांचे स्वतंत्र ऑडिट होणे आवश्यक आहे. कारण ९६ प्रकरणे उघडकीस आली म्हणजे बाकी सर्व काही निर्दोष आहे, असे समजण्याचे कारण नाही. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या प्रकरणात दाखवलेली तत्परता महत्त्वाची आहे. पण आता ही लढाई केवळ पाडकाम मोहिमेपुरती न राहता प्रशासकीय स्वच्छता मोहीम बनली पाहिजे. भ्रष्ट साखळी तुटली नाही तर नवीन बोगस परवाने, नवीन इमारती आणि नवीन बळी निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे या प्रकरणात केवळ काही कर्मचारी किंवा




कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करून विषय संपवणे हे वास्तवापासून दूर जाणारे ठरेल. जबाबदारीची साखळी वरिष्ठ पातळीपर्यंत तपासली गेली पाहिजे. सोलापूरसारख्या वाढत्या शहराला नियोजनबद्ध विकास हवा आहे, 'परवान्यांच्या दलदलीत' अडकलेला विकास नव्हे. अनधिकृत बांधकामांवर कारवाईसोबत प्रशासनातील जबाबदार चेहऱ्यांनाही उत्तरदायी ठरवा अन्यथा शहराचा विश्वास परत मिळणार नाही. महापालिकेने सुरू केलेली धडक कारवाई निश्चितच आवश्यक आहे. नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. अनधिकृत बांधकामांवर हातोडा चाललाच पाहिजे. पण तो हातोडा केवळ भिंतींवर चालून उपयोग नाही, तो भ्रष्टाचार, निष्क्रियता आणि संगनमताच्या व्यवस्थेवरही चालला पाहिजे.

मागील काही वर्षांतील सर्व संशयास्पद परवान्यांचे स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय ऑडिट करणेही अत्यावश्यक आहे. सर्वच विभागातील आवक-जावक रजिस्टर, अनियमितता, तक्रारी, दिलेले परवाने आणि प्रत्यक्षात काय स्थिती आणि शहरातील प्रत्येक मिळकतीचा बांधकाम परवाना तसेच महापालिकेतील इतर परवान्यांची पडताळणी तसेच सहामाही, वार्षिक संपूर्ण आढावा, चौकस अहवाल तयार करण्यात आला पाहिजे. त्यावर कार्यवाही आणि कारवाई करणे आवश्यक आहे.

महापालिका प्रशासनाने आता केवळ कारवाईची भूमिका न घेता सुधारणेची भूमिका स्वीकारली पाहिजे. दोषींवर कठोर कारवाई, वरिष्ठ स्तरावरील जबाबदारी निश्चित करणे आणि बांधकाम विभागात व्यापक प्रशासकीय स्वच्छता मोहीम राबवणे ही काळाची गरज आहे.

# राजकीय पक्ष अन् शासकीय यंत्रणांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे

**जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १८ मे २०२६ रोजी महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्याच अनुषंगाने त्या दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे.

ही आचारसंहिता लोकसभा व विधानसभा निवडणूक प्रमाणे असणार आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्ष तसेच शासकीय यंत्रणांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित राजकीय पक्ष प्रतिनिधी तसेच शासकीय यंत्रणाच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा प्रशासन अधिकारी योगेश डोके तसेच विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन पुढे म्हणाले की, या निवडणुकीत एकूण १९ स्थानिक संस्था सहभागी होत असून, त्यात जिल्हा परिषद, सोलापूर महापालिका तसेच १७ नगरपरिषद व नगरपंचायतांचा समावेश आहे. एकूण मतदारसंख्या ६१६ असून, त्यात ५४४ सामान्य मतदार, ४९ नामनिर्देशित व २३ अध्यक्षीय (पंचायत समिती सभापती, नगराध्यक्ष) मतदारांचा समावेश आहे. नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील कलेक्टर चेंबर निश्चित करण्यात आले आहे.

अर्ज दाखल करण्याची वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ अशी राहणार असून, अर्ज शुल्क १०० रुपये आहे. खुल्या गटासाठी ठेव रक्कम १० हजार तर अनुसूचित जाती-जमातीसाठी ५ हजार रुपये आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

मतदानासाठी एकूण ६ मतदान केंद्रे प्रस्तावित असून ती उपविभागीय अधिकारी स्तरावर उभारण्यात येणार आहेत. मतमोजणीचे केंद्र नियोजन भवन, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे राहील. आज सायंकाळपर्यंत मतदार यादी फायनल करून सर्व राजकीय पक्ष यांना देण्यात येतील तसेच तहसील कार्यालय गटविकास अधिकारी कार्यालय उपविभागीय अधिकारी कार्यालय दर्शनी भागात ठेवण्यात येतील.

ही निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असल्याचेही कार्तिकेयन यांनी सांगितले.

### झोपलेल्या हमालाला बोलेरोची धडक

**सोलापूर :** काम करून दुकानासमोर झोपलेल्या एका हमालाच्या अंगावरून गाडी घालून त्याला जखमी केल्याप्रकरणी माढ्याच्या एका बोलेरो चालकाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विशाल सतीश ताटे (रा. मु.पो. शेडशिगे, ता. माढा) असे आरोपीचे नाव असून यशपाल सुरेश उडाणशिव (रा.१३७, मुकुंद नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा भाऊ अनिरुध्द हा २०मे रोजी पहाटे १.३०च्या सुमारास मार्केट यार्ड येथील सुर्या हॉटेल येथील आडत दुकानासमोर हमालीचे काम करुन झोपला असता आरोपीने बोलेरो पिकअप (क्रं. एम एच ०४ के यु ०१२९) वाहन हयगईने चालवून फिर्यादीच्या भावाच्या अंगावर घातली. यात डोक्याला गंभीर जखम व पायाला मुका मार आणि सर्वांगास खरचटण्यास आरोपी कारणीभूत झाला. पोलीस हवालदार राठोड हे पुढील तपास करीत आहेत.

## अग्रलेख...

# बेगडी भूतदयेला चपराक

'भीक नको पण कुत्रा आवर' ही म्हण उगाच समाजात प्रचलित झाली नाही. कारण कुणालाही 'कुत्र्याच्या मौतीने मरणे' म्हणजे, हाल हाल होऊन मरणे लोकांना अपेक्षित नाही. त्यामुळे श्वानांविषयीचे जेवढे बेगडी प्रेम उच्चभ्रूंना आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त दहशत सर्वसामान्य जनतेत आहे. नजीकच्या काळात तर आपल्या गल्लीबोळांतून शांतपणे चालणेदेखील मोठी कसरत होऊन बसली आहे. कधी पाठीमागून येऊन एखादा मोकाट श्वान कुणाच्या पायाचा लचका तोडेल, याचा काही नेम नाही. विशेषतः लहान मुलांवर, ज्येष्ठ नागरिकांवर श्वानांच्या टोळीने थेट जीवघेणे हल्ले केल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. प्राणी दया आणि मानवी हक्क यांच्यातल्या या लढाईत सामान्य माणसाचा जीव टांगणीला लागला असताना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ऐतिहासिक निर्णय कोट्यवधी भयभीत नागरिकांना दिलासा देणारा आहे. शेवटी न्यायालयानेही नागरिकांचा जीव जास्त महत्त्वाचा आहे, असे मानले. धोकादायक आणि पिसाळलेल्या श्वानांना वेदनारहित मृत्यू दिला जाऊ शकतो, हा निर्णय या समस्येवरील उपाय सर्वोच्च न्यायालयाने सुचविला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनाने हा अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला आहे. जे मोकाट श्वान माणसासाठी धोका ठरू शकतात, पिसाळलेले आहेत किंवा असाध्य आजारांनी ग्रस्त आहेत, त्यांना आता वेदनारहित मृत्यू दिला जाऊ शकतो. यात आणखी एक समजून घेतले पाहिजे की, न्यायालयाने अगदी सरसकट सगळ्या भटक्या श्वानांना 'मौत के घाट उतारों' असे म्हटलेले नाही. ज्या भागात मोकाट श्वानांची संख्या चिंताजनक व धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे, तिथे नागरी प्रशासन त्यांना मृत्यू देण्याचा पर्याय निवडू शकते, असे म्हटले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा-१९६०' आणि 'प्राणी जन्म नियंत्रण नियम-२०२३'च्या चौकटीत राहून, पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली केली जावी, असेही नमूद केले गेले आहे. त्यामुळे उगाच या निकालाचा बाऊ केला जाऊ नये. आता काही तथाकथित श्वानप्रेमी बेंबीच्या देठापासून ओरडतील. त्यामुळे एक पाऊल पुढे जाऊन न्यायालयाने, या आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कोणताही 'एफआयआर' किंवा कठोर कारवाई केली जाऊ नये, असेही स्पष्ट करीत, प्रशासनाचे हात बळकट केले आहेत.

हा निर्णय न्यायालयाला का घ्यावा लागला यामागे देशातील भीषण परिस्थिती कारणीभूत आहे. मागच्या वर्षभरातील एकट्या महाराष्ट्राच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. राज्यात श्वानांनी चावा घेतल्याच्या तब्बल ४ लाख ३० हजारांहून अधिक घटना आहेत. रेबीजमुळे झालेले मृत्यू ७० पेक्षा जास्त आहेत. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात एप्रिल २०२० ते २०२५ च्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत मोकाट श्वानांनी ४४ हजार २९९ लोकांना चावा घेऊन जखमी केले आहे तर दोघांचा मृत्यूही झाला आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि ठाण्यासारख्या मोठ्या शहरांतही मोकाट श्वानांची दहशत कमालीची वाढली आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांच्या मागे धावणे, पहाटे फिरायला जाणाऱ्या वृद्धांवर हल्ले करणे आणि झोपडपट्टी किंवा सोसायट्यांच्या आवारात खेळणाऱ्या लहान मुलांना लक्ष्य करणे अशा घटना रोजच्या झाल्या आहेत. रेबीज आजारावर अजूनही शंभर टक्के खात्रीशीर उपचार आहे, असे म्हणता येत नाही. आजही 'ॲण्टी रेबीज व्हॅक्सिन', 'ॲण्टी रेबीज सिरम' मोठ्या शहरांमध्येसुद्धा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांबाबत तर बोलायलाच नको. अशा स्थितीत जनतेला वाऱ्यावर सोडणे न्यायव्यवस्थेला मान्य नव्हते आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा हा अतिशय योग्य आणि काळाची गरज ठरला आहे.

भारतीय संविधानाचे कलम २१ प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सुरक्षितपणे जगण्याचा अधिकार देते. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नेमक्या याच मुद्यावर बोट ठेवले आहे. सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरणाऱ्या श्वानांच्या भीतीविना मुक्तपणे फिरण्याचा अधिकारदेखील या मूलभूत अधिकारांत समाविष्ट आहे. श्वान चावण्याच्या भीतीने माणसाने स्वतःला घरात कोंडून घ्यायचे का? रात्री-अपरात्री कामावरून घरी येताना हातात काठी घेऊन फिरायचे का? या प्रश्नांची उत्तरे या निकालातून मिळाली आहेत. या समस्येचा दुसरा पैलू म्हणजे, पाळीव प्राण्यांच्या शौकिनांचे काय...? तर ज्यांना श्वान पाळण्याची आवड आहे, त्यांनी ते नक्की करावे. त्यात कुणाला किंतु-परंतु असण्याचे कारण नाही. पण तुम्ही तुमची आवड तुमच्या घरात ठेवा, ती दुसऱ्याच्या जिवावर उठू देऊ नका, हा साधा नियम आहे आणि तो पाळला गेलाच पाहिजे. लोक महागडे श्वान पाळतात, पण त्यांना शौचास बसवण्यासाठी सकाळी सकाळी सार्वजनिक ठिकाणी घेऊन जातात. भूतदयावान असलेला बंगल्याचा मालक आपल्या कुत्र्याचा प्रातर्विधी शेजारच्या घरासमोर उरकतो. शिवाय त्यांचे श्वान इतरांवर भुंकतात, चावण्याचा प्रयत्न करतात. आपल्याकडील पाळीव प्राण्यामुळे शेजाऱ्यांना किंवा पादचाऱ्यांना त्रास होत असेल तर ती भूतदया नसून तो बेजबाबदारपणा आहे. तुम्हाला प्राणी पाळायचा असेल, तर त्याच्या सुरक्षिततेची, खाण्यापिण्याची आणि मलविसर्जनाची संपूर्ण व्यवस्था तुमच्या स्वतःच्या हद्दीत करा. दुसऱ्याला चावण्यासाठी किंवा त्रास देण्यासाठी तुमच्या लाडक्या श्वानांना रस्त्यावर मोकळे सोडू नका. तसे होत असेल तर तो गुन्हाच मानला गेला पाहिजे. समाज माध्यमांवर प्राण्यांच्या हक्कासाठी लांबलचक 'पोस्ट' टाकणारे 'ॲनिमल लव्हर्स' अनेकदा अशा समस्येवरील उपायांचे मुख्य खलनायक ठरतात. जेव्हा महानगरपालिका किंवा नगरपालिका यंत्रणा मोकाट श्वानांना पकडायला येते, तेव्हा हेच लोक ढाल बनून उभे ठाकतात. मोकाट श्वानांना खायला घालणारेही बरेच आहेत. दयाभाव म्हणून ते समजून घेता येते. पण त्यामुळे त्या सार्वजनिक भागात कुत्र्यांचा वावर वाढतो आणि तिकडच्या लोकांची सुरक्षा संकटात येते. श्वान मुलांच्या अंगावर तुटून पडतात, याचे भान या कथित श्वानप्रेमींना असायला हवे. मोकाट श्वानांची टोळी एखाद्या गरिबाच्या चिमुकल्याला ओरबडून टाकते, तेव्हा हे भूतदयेचा शंखनाद करणारे कार्यकर्ते कुठे असतात? त्या मृत बालकाच्या आई-वडिलांचे अश्रू पुसायला ते का येत नाहीत? कारण या लोकांची भूतदया अत्यंत सोयीची आणि पोकळ असते. इतरांच्या लेकरांचे बळी जातानाही त्यांना प्राण्यांचे हक्क आठवतात. स्वतःच्या घरातील सदस्याला श्वानाने चावा घेतला की, यांची तत्त्वे लगेच बदलतात. अशा ढोंगी विचारसरणीवर सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाद्वारे प्रहार केला आहे.

निसर्गाच्या साखळीत प्रत्येक प्राण्याला स्थान आहे, हे मान्य केले तरी मानवी वस्तीत माणसाचा जीव हाच सर्वोच्च असला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता स्थानिक प्रशासनाला काम करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. तरी ते काम करणार नसतील तर त्यांच्यावरही न्यायालयाच्या अवमानाचा खटला चालवला जावा, असे निकालात स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात प्राण्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे, त्यासाठी ठिकठिकाणी केंद्रे उभारणे, ॲण्टी-रेबीज औषधांची पुरेशी उपलब्धता करणे, धोकादायक ठरणाऱ्या श्वानांना हटवणे, गरज पडल्यास त्यांना वेदनारहित मृत्यू देणे हे सारे आता गरजेचे होऊन बसले आहे. अतिरेकी व अविचारी भूतदयेचा पुळका बाजूला सारून वास्तवाचे भान ठेवले पाहिजे. शहरांना आणि गावांना भयमुक्त केले पाहिजे. आता तर जंगल परिसरही या श्वानांपासून जपण्याची वेळ आली आहे. जंगलाच्या आसपासच्या गावांमधील भटक्या श्वानांचा वन्यजीवांना धोका मोठा आहे. या श्वानांनी हरीण, ससा, मोर, कोल्हे आणि छोटे पक्षी यासारख्या प्राण्यांवर हल्ले करून त्यांना ठार केल्याच्या घटना घडत आहेत. त्यांना अर्धवट खाऊन सोडल्यामुळे 'रेबीज आणि डिस्टेंपर'सारखे घातक रोग वन्यजीवांमध्ये पसरले आहेत. त्यावर उपाय म्हणून व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्य प्रशासनाने नजीकच्या गावांमध्ये विशेष मोहीम राबवून भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करण्यावर भर दिला आहे. आता न्यायालयाच्या या निर्णयानंतर तरी नगर व ग्रामीण प्रशासनाने जागे व्हावे आणि नागरिकांना सुरक्षित जीवन जगू द्यावे, एवढेच.

---

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# भारतीय रेल्वेची धडाकेबाज योजना

दीर्घकाळ भारतीय रेल्वेचा विस्तार मुख्यतः सरकारी निधीवर आधारित होता; मात्र वाढत्या लोकसंख्येचा दबाव, औद्योगिक वाढ आणि पायाभूत सुविधांवरील वाढती मागणी पाहता केवळ सरकारी निधीवर रेल्वेचा विस्तार करणे कठीण होत चालले आहे. केंद्र सरकारसमोर आरोग्य, शिक्षण, संरक्षण, ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण आणि शहरी पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत रेल्वे क्षेत्रात खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू झाला आहे. रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी मिळवलेल्या सहा प्रकल्पांमध्ये मुख्यतः मालवाहतुकीसाठीचे रेल्वे कॉरिडॉर उभारले जाणार आहेत. चार कोळसा वाहतूक कॉरिडॉर, एक बॉक्साईट वाहतूक मार्ग आणि एक लोखंड धातू वाहतूक कॉरिडॉर या योजनांमध्ये समाविष्ट आहेत. या सर्व प्रकल्पांची एकत्रित लांबी सुमारे ६४० किलोमीटर असेल. हे मार्ग विशेषतः खाण, ऊर्जा आणि अवजड उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. भारतातील वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात कोळशावर आधारित आहे. देशातील अनेक वीज प्रकल्पांना वेळेवर कोळसा पोहोचवण्यात रेल्वेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनेकदा कोळसा वाहतुकीतील अडचणींमुळे वीजनिर्मितीवर परिणाम होतो. त्यामुळे स्वतंत्र मालवाहतूक कॉरिडॉर उभारल्यास कोळसा वाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम होऊ शकते. त्याचप्रमाणे बॉक्साईट आणि लोखंड धातू वाहतुकीमुळे स्टील आणि धातू उद्योगालाही मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पांची सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ते सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात 'पीपीपी' मॉडेलवर उभारले जाणार आहेत.

यावेळी रेल्वे मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल केले आहेत. सर्वप्रथम, प्रकल्पांचा सवलत कालावधी ५० वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजे खाजगी कंपन्यांना दीर्घकाळ महसूल मिळवण्याची संधी असेल. दुसरे म्हणजे, जमीन अधिग्रहणाची जबाबदारी रेल्वे स्वतः घेणार आहे. भारतात पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जमीन अधिग्रहण हा सर्वांत मोठा अडथळा मानला जातो. त्यामुळे खाजगी गुंतवणूकदारांवरील धोका कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सरकार 'व्हायेबिलिटी गॅप फंडिग' मॉडेलही वापरणार आहे.



रेल्वेने 'मिशन ३०००' अंतर्गत २०३० पर्यंत वार्षिक मालवाहतूक क्षमता ३००० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारतात रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वे मालवाहतूक स्वस्त आणि पर्यावरणपूरक मानली जाते. त्यामुळे लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी रेल्वेचा वापर वाढवणे आवश्यक मानले जात आहे.

भारतामध्ये सध्या उद्योग क्षेत्राला उच्च लॉजिस्टिक्स खर्चाचा सामना करावा लागतो. अनेक विकसित देशांमध्ये लॉजिस्टिक्स खर्च जीडीपीच्या तुलनेत कमी असतो; पण भारतात तो तुलनेने जास्त आहे. याचा परिणाम भारतीय उद्योगांच्या स्पर्धात्मकतेवर होतो. रेल्वे मालवाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम झाल्यास उद्योगांच्या वाहतूक खर्चात मोठी बचत होऊ शकते. या प्रकल्पांमुळे बंदरे, खाण क्षेत्रे आणि औद्योगिक पट्टे यांना अधिक चांगली रेल्वे जोडणी मिळेल. परिणामी, निर्यातक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते. 'मेक इन इंडिया' आणि उत्पादन क्षेत्राच्या विस्ताराच्या दृष्टीनेही ही गुंतवणूक महत्त्वाची ठरते; मात्र या निर्णयाकडे केवळ सकारात्मक दृष्टीने पाहून चालणार नाही. रेल्वे हा सार्वजनिक सेवाक्षेत्राचा भाग आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढल्यास भविष्यात मालवाहतूक दर वाढतील का, नफ्यावर जास्त भर दिला जाईल का, याबाबत प्रश्न उपस्थित होतात. याशिवाय 'पीपीपी' मॉडेल भारतात अनेक क्षेत्रांमध्ये मिश्र परिणाम देणारे ठरले आहे. काही प्रकल्प यशस्वी झाले, तर अनेक प्रकल्प आर्थिक अडचणीत अडकले. त्यामुळे रेल्वे क्षेत्रातही पारदर्शक करार, स्पष्ट जबाबदाऱ्या आणि प्रभावी नियमन आवश्यक असेल. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पर्यावरणीय परिणाम. कोळसा वाहतुकीसाठी स्वतंत्र कॉरिडॉर उभारणे आर्थिकदृष्ट्या आवश्यक असले, तरी भारताने हरित ऊर्जेकडे वाटचाल करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. व्यापक पातळीवर पाहता भारतीय रेल्वे आता मोठ्या संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीला प्राधान्य देत देशात जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्प, बुलेट ट्रेन, स्टेशन पुनर्विकास आणि आता खाजगी सहभागातून उभारले जाणारे नवे कॉरिडॉर या सर्व प्रकल्पांमधून रेल्वेचे स्वरूप बदलताना दिसत आहे. आर्थिक वाढ टिकवून ठेवायची असेल, तर मजबूत आणि आधुनिक वाहतूक व्यवस्था अपरिहार्य आहे. रेल्वे हा त्यातील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याचा निर्णय गरजेचा मानला जाऊ शकतो; पण त्याच वेळी सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि दीर्घकालीन राष्ट्रीय गरजा यांचा समतोल राखणेही आवश्यक राहणार आहे. भारतीय अर्थव्यवस्था सध्या जागतिक पटलावर वेगाने विस्तारत आहे. भारतीय रेल्वेने आपल्या मालवाहतूक क्षेत्रात खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी घेतलेला पुढाकार हा केवळ धोरणात्मक बदल नसून एक क्रांतिकारी टप्पा ठरणार आहे. आज भारताच्या एकूण मालवाहतुकीमध्ये रस्ते वाहतुकीचा वाटा साठ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, तर रेल्वेचा वाटा २७ ते २८ टक्क्यांच्या आसपास स्थिरावला आहे. विकसित देशांमध्ये हे प्रमाण उलट असते. रेल्वे मालवाहतूक ही रस्ते वाहतुकीपेक्षा पर्यावरणपूरक आणि मोठ्या प्रमाणात मालाची ने-आण करण्यासाठी स्वस्त असते, तरीही पायाभूत सुविधांचा अभाव, मालाच्या चढ-उतारासाठी लागणारा वेळ आणि लवचीकतेचा अभाव यामुळे रेल्वे मागे पडत होती. सरकारी तिजोरीवर असलेला ताण आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब या मर्यादा ओळखून केंद्र सरकारने 'पीएम गतिशक्ती' आणि 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी'अंतर्गत खाजगी सहभागाला लाल गालिचा अंथरला आहे. रेल्वेने खाजगी क्षेत्राला आकर्षित करण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या आहेत. 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर'मुळे मालवाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका तयार केल्या जात आहेत. यामुळे मालवाहू गाड्यांचा वेग वाढणार असून खाजगी कंपन्यांना स्वतःचे टर्मिनल विकसित करण्याची संधी मिळत आहे. 'गतिशक्ती कार्गो टर्मिनल्स' धोरणांतर्गत खाजगी संस्थांना रेल्वेच्या किंवा स्वतःच्या जमिनीवर कार्गो टर्मिनल उभारण्याची परवानगी दिली जात आहे. यामुळे मालाची हाताळणी अधिक वेगाने आणि आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करणे शक्य होईल. तसेच 'लिबरलाइज्ड वॅगन इन्व्हेस्टमेंट स्किम'सारख्या योजनांमुळे उद्योजक विशिष्ट प्रकारच्या वॅगन्स खरेदी करू शकतात आणि रेल्वे नेटवर्कचा वापर करू शकतात. खाजगी गुंतवणूक केवळ पैसा आणत नाही, तर कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानदेखील आणते, हे यातून दिसू शकते.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गडचिरोली बदलतेय..

गडचिरोली म्हटले की काही वर्षांपूर्वी डोळ्यासमोर उभे राहायचे ते दाट जंगल, दुर्गम भाग, भीतीचे वातावरण आणि माओवादाच्या सावटाखाली जगणारे सामान्य नागरिक. बंदुकीच्या आवाजात अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, विकासाची वाट खुंटली आणि भीती हेच जणू दैनंदिन जीवनाचे वास्तव बनले होते. केवळ बंदुकीने किंवा कारवाईने हा प्रश्न सुटणारा नव्हता. यासाठी गरज होती ती लोकांचा विश्वास जिंकण्याची, त्यांच्या मनात पोलिस दलाबद्दल आपलेपणाची भावना निर्माण करण्याची आणि विकासाची नवी दिशा दाखवण्याची. गडचिरोली पोलिस दलाने नेमके हेच काम गेल्या काही वर्षांत सातत्याने करून दाखवले आहे. पोलिस म्हणजे केवळ गुन्हेगारांवर कारवाई करणारी यंत्रणा अशी सर्वसामान्य धारणा असते. गडचिरोलीत मात्र पोलिस दलाने ही पारंपरिक चौकट मोडून काढली. येथे पोलिसांनी फक्त शस्त्र हाती घेतले नाही, तर समाजाच्या जखमांवर फुंकर घालण्याचे काम केले. नक्षलवादाच्या समस्येला सुरक्षा प्रश्न म्हणून न पाहता, ती सामाजिक आणि मानसिक समस्या म्हणून हाताळण्याचा प्रयत्न झाला. यालाच 'सोशल पोलिसिंग' असे म्हटले जाते.



गडचिरोलीत आलेल्या अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी या संकल्पनेवर सातत्याने भर दिला. राजवर्धन, शिरीष जैन, राजेश प्रधान, विदेश प्रभू, संदीप पाटील, नीलोत्पल आणि विद्यमान पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्यांनी गावोगावी जाऊन लोकांचे प्रश्न ऐकले, आदिवासी बांधवांशी संवाद साधला आणि पोलिस दल हे शत्रू नसून तुमचे मित्र आहेत, हा विश्वास निर्माण केला.

गडचिरोली पोलिस दलाने राबविलेल्या दादालोरा खिडकी योजनेने अनेक दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून दिला. एखाद्या गरीब कुटुंबाला दाखले, शिष्यवृत्ती, आरोग्य सेवा किंवा रोजगार योजनांसाठी सरकारी दारात हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी पोलिस स्वतः पुढाकार घेताना दिसले. एका अर्थाने बंदूक हातात घेणाऱ्या पोलिसांनीच हातात विकासाची फाईल घेत लोकांच्या दारात पोहोचण्याचे काम केले. रोजगार मेळावे, आरोग्य शिबिरे, जनजागृती अभियान, आदिवासी विद्यार्थ्यांच्या सहली, मॅरेथॉन स्पर्धा, सामूहिक विवाह सोहळे यासारखे उपक्रमही या सोशल पोलिसिंगचा महत्त्वाचा भाग ठरले. दुर्गम जंगलात राहणाऱ्या तरुणांना शिक्षण, रोजगार आणि चांगल्या आयुष्याची वाट दाखविण्यासाठी पोलिस दलाने घेतलेली मेहनत उल्लेखनीय आहे. एका तरुणाच्या हातात बंदूक नको तर रोजगाराचे साधन असावे; एका विद्यार्थ्याच्या मनात भीती नको तर मोठी स्वप्ने असावीत या भावनेतून हे उपक्रम राबविले गेले. आदिवासी विद्यार्थ्यांना जिल्ह्याबाहेर, राज्याबाहेर शैक्षणिक सहलींना नेऊन त्यांना बाहेरचे जग दाखविण्याचा प्रयत्न झाला. जंगलाबाहेरही एक वेगळे जग आहे, शिक्षणातून प्रगती करता येते, सरकारी योजनांचा लाभ घेता येतो, ही जाणीव या मुलांच्या मनात निर्माण झाली. अशा अनेक उपक्रमांनी पोलिस दलाची प्रतिमा केवळ सुरक्षा रक्षकांची न राहता, समाज घडविणाऱ्या संस्थेची बनली. आरोग्य मेळाव्यांमुळे दुर्गम भागातील अनेक आदिवासींना प्रथमच तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा मिळाली. मॅरेथॉन आणि क्रीडा स्पर्धांमुळे तरुणाईला सकारात्मक दिशा मिळाली. सामूहिक विवाह सोहळ्यांमुळे गरीब कुटुंबांवरील आर्थिक भार हलका झाला. जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करून अनेक कुटुंबांना आधार देण्यात आला. हे सारे उपक्रम पाहिले की एक गोष्ट स्पष्ट होते - गडचिरोली पोलिस दलाने फक्त कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम केले नाही, तर समाजाचे पालकत्व स्वीकारल्यासारखी भूमिका घेतली. माओवाद्यांविरोधातील कठोर कारवाई आणि दुसरीकडे आत्मसमर्पण करणाऱ्यांसाठी पुनर्वसनाची संधी हा पोलिस दलाचा संतुलित दृष्टिकोन आहे. ज्यांनी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला, त्यांना नव्याने आयुष्य जगण्याची संधी देण्यात आली. एका माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देण्याची मानवतावादी भूमिका आहे. आज गडचिरोलीत माओवाद संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याचा दावा केला जातो, त्यामागे फक्त बंदुकीची ताकद नाही; त्यामागे लोकांचा विश्वास, पोलिस दलाची सातत्यपूर्ण मेहनत आणि समाजाला सोबत घेऊन चालण्याची कार्यपद्धती आहे. एकेकाळी भीतीने ग्रासलेल्या गावांमध्ये आज विकासाच्या चर्चा होतात, मुलांच्या शिक्षणाची स्वप्ने पाहिली जातात, रोजगाराच्या संधींबद्दल बोलले जाते, हे परिवर्तन सहज घडलेले नाही. आज गडचिरोलीच्या जंगलात शांततेची चाहूल लागते आहे आणि या शांततेमागे केवळ गोळीबार नाही तर पोलिस दलाने वर्षानुवर्षे घाम गाळून उभा केलेला विश्वास, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी आहे. हाच गडचिरोली पोलिस दलाचा खरा विजय म्हणावा लागेल.

९९२२९९९५८८

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# फुटीचा फायदा विजय उचलतील का?

तामिळनाडूत टीव्हीकेचे नेते आणि मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या विश्वासदर्शक प्रस्तावावरील मतदानातून अण्णाद्रमुक पक्षात पुन्हा एकदा फूट पडली आहे. या फुटीचा फायदा मुख्यमंत्री विजय घेतील की द्रमुकचे माजी मुख्यमंत्री स्टॅलिन उचलतील, याकडे आता सर्वांचे लक्ष राहणार आहे. अण्णाद्रमुकमधील सी.व्ही. षण्मुगम आणि एस.पी. वेलुमणी यांच्या नेतृत्वातील २५ आमदारांनी विश्वासदर्शक प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले. विधानसभा निवडणुकीत टीव्हीकेचे नेते विजय यांना सर्वाधिक जागा मिळाल्या. २३४ सदस्यांच्या तामिळनाडू विधानसभेत विजय यांच्या पक्षाने १०८ जागा जिंकल्या; प्रत्यक्षात विजय दोन मतदारसंघातून विजयी झाल्यामुळे पक्षाच्या आमदारांची संख्या मात्र १०७ झाली. बहुमतासाठी विजय यांच्या पक्षाला ११ जागा कमी पडल्या. पाच जागा जिंकणाऱ्या काँग्रेस पक्षाने विजय यांना सरकार बनवण्यासाठी पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे आघाडीचे संख्याबळ ११२ झाले. तरीही पक्षाला बहुमतासाठी ६ जागा कमी पडत होत्या.

भाकप, माकप, व्हीसीके आणि मुस्लिम लीग या पक्षांचे प्रत्येकी दोन आमदार निवडून आले आहेत. या पक्षांनीही विजय यांना पाठिंबा दिल्यामुळे आघाडीने बहुमतासाठी आवश्यक असलेला आकडा गाठला. त्यामुळे विजय यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेता आली. बहुमत नसल्यामुळे त्या आधी राज्यपालांनी अनेक वेळा विजय यांना 'वेटिंग'वर ठेवले होते. विश्वासदर्शक प्रस्तावावर विजय यांना १२० मते पडतील, असे अपेक्षित असताना त्यांना अण्णाद्रमुकमधील बंडखोर आमदारांची लॉटरी लागली. २५ आमदारांचा पाठिंबा मिळाल्यामुळे विजय यांच्या सरकारच्या विश्वासदर्शक प्रस्तावाच्या बाजूने १४४ आमदारांनी मतदान केले. बहुमतासाठी वणवण फिरत असलेल्या विजय यांच्या पक्षाचा राजकीय चमत्कार म्हणूनही याकडे पाहात येईल. १६७ जागा लढवणाऱ्या अण्णाद्रमुकला राज्यात ४७ जागा जिंकता आल्या. पलानीस्वामी अण्णाद्रमुक विधिमंडळ पक्षाचे नेते असल्याचा दावा एका गटाने केला, तर दुसऱ्या गटाने वेलुमणी यांना पक्षाचा नेता करण्याची मागणी केली. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या द्रमुकने मतदानावर बहिष्कार घातला होता. विरोधात पडलेली २२ मते अण्णाद्रमुकमधील पलानीस्वामी गटाच्या आमदारांची होती. यामुळे सध्या तरी काही महिने विजय यांच्या पक्षाला कोणताही धोका नाही. राज्यातील द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन पक्षांची एकाधिकारशाही विजय यांच्या पक्षाने संपवली, हे मान्य करावेच लागेल. जवळपास ६० वर्षे राज्यात हे दोन पक्ष आलटून-पालटून सत्तेवर होते. विजय यांचा टीव्हीके पक्ष बहुमतापासून दूर असताना राज्यात द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करण्याची चर्चाही सुरू झाली होती. मात्र, त्याला अधिकृतपणे कोणी दुजोरा दिला नव्हता. द्रमुक आणि अण्णाद्रमुक हे एकदुसऱ्याचे कट्टर प्रतिस्पर्धी पक्ष आहेत. साप आणि मुंगूस म्हणूनही त्यांच्याकडे पाहता येईल.



राजकारणात कधी काय होईल, हे सांगता येत नाही. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू वा मित्र नसतो, असे म्हणतात. उत्तरप्रदेशात काही वर्षांपूर्वी एकदुसऱ्याचे कट्टर विरोधक असलेल्या सपा आणि बसपा यांनी एकत्र येत सरकार बनवलेच होते. त्यामुळे तामिळनाडूत द्रमुक आणि अण्णाद्रमुक सरकार बनवण्यासाठी एकत्र येणार या बातमीने राज्यातील जनता सोडून बाहेर फार कुणाला आश्चर्य वाटले नाही. विजय यांच्या पक्षाच्या उसन्या बहुमतावर द्रमुकचे नेते आणि माजी मुख्यमंत्री स्टॅलिन यांना भरवसा नाही. राज्यातील सरकार कधीही कोसळू शकते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी मध्यावधी निवडणुकीसाठी तयार राहावे, असे आवाहन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह टिकविण्यासाठी असे बोलावेच लागते, हा भाग वेगळा. अण्णाद्रमुकमध्ये अजूनपर्यंत औपचारिकपणे फूट पडली नाही. पक्षात फूट पडण्यासाठी दोनतृतीयांश म्हणजे किमान ३२ आमदारांची आवश्यकता आहे. पण बंडखोर गटाकडे सध्या फक्त २५ आमदार आहेत, म्हणजे ७ आमदार कमी आहेत. या २५ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी अण्णाद्रमुकचे नेते पलानीस्वामी करू शकतात. पण ही मागणी विधानसभेच्या सभापतींकडे करावी लागते. सभापती सत्ताधारी टीव्हीके पक्षाचे असल्यामुळे या मागणीची दखल घेतली जाणार नाही, यात शंका नाही. त्यामुळे सध्या तरी या आमदारांना अपात्र होण्याचा कोणताही धोका नाही. कोणतेही सरकार भक्कमपणे चालवायचे असेल तर बहुमतासोबत विधानसभेचा सभापती हा तुमच्या पक्षाचा आणि मुख्यमंत्र्यांच्या विश्वासातील पाहिजे. म्हणजे सरकारला कोणत्याही परिस्थितीत धोका पोहोचत नाही. राज्यातील जनतेने विजय यांना मुख्यमंत्री करण्यासाठी जनादेश दिला होता, त्या जनादेशाचा आदर करण्यासाठी आम्ही विजय यांच्या सरकारवरील विश्वासदर्शक प्रस्तावाला पाठिंबा दिल्याचा दावा, बंडखोर गटाचे नेते वेलुमणी करीत आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी द्रमुकला पाठिंबा दिला असता तर अण्णाद्रमकचे अस्तित्वच संपले असते, अशी भीती वेलुमणी यांनी व्यक्त केली, जी निराधार म्हणता येणार नाही. १९७२ मध्ये द्रमुकमधून बाहेर पडत एम.जी. रामचंद्रन यांनी अण्णाद्रमकची स्थापना केली होती. रामचंद्रन यांच्या निधनानंतर जानकी रामचंद्रन मुख्यमंत्री झाल्यानंतर पक्षात फूट पडली, पण ती अतिशय छोटी होती. जानकी रामचंद्रन यांच्यानंतर अण्णाद्रमुकचे नेतृत्व जयललिता यांच्याकडे आले. जयललिता यांनी अतिशय खंबीरपणे अण्णाद्रमुकचे नेतृत्व केले.

२०१६ मध्ये जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकचे नेतृत्व पलानीस्वामी यांच्याकडे आले. पण नंतर त्यांच्यात आणि पनीरसेल्वम यांच्यातही मतभेद झाले; परिणामी अण्णाद्रमुकमध्ये दोन गट निर्माण झाले. विधानसभा निवडणुकीच्या आधी पनीरसेल्वम यांनी द्रमुकमध्ये प्रवेश केला. ही पण अण्णाद्रमुकमधील फूटच म्हटली पाहिजे. कारण पनीरसेल्वम यांनीही अण्णाद्रमुकचे नेते तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळले आहे.

विजय यांच्या सरकारच्या विश्वासदर्शक प्रस्तावावरील मतदानाच्या मुद्यावरून पुन्हा एकदा अण्णाद्रमकमध्ये फूट पडली आहे. वेलुमणी गटाच्या आमदारांची संख्या ३२ होत नाही, तोपर्यंत त्यांना आपला वेगळा गट स्थापन करता येत नाही, असा गट ते स्थापन करत नाही, तोपर्यंत त्यांना विजय यांच्या सरकारला अधिकृतपणे पाठिंबा देता येत नाही आणि सरकारमध्ये सहभागीही होता येत नाही. अण्णाद्रमुकमधील वेलुमणी गट विजय यांच्या सरकारला पाठिंबा देणार नाही, तोपर्यंत त्यांचे सरकार स्थिर आणि मजबूत होणार नाही. असा गुंता तामिळनाडूच्या राजकारणात निर्माण झाला आहे. विजय यांना काहीही करून अण्णाद्रमुकमधील या गटाला सरकारमध्ये सहभागी करून घ्यावे लागेल, तेव्हाच्या त्यांच्या सरकारला स्थिरता मिळणार आहे. अन्यथा छोट्या-मोठ्या मुद्यावरून काँग्रेस, भाकप, माकप आणि व्हीसीके हे पक्ष विजय यांच्या पक्षाला वेळोवेळी ब्लॅकमेल केल्याशिवाय राहणार नाही. अण्णाद्रमुकमधील बंडखोर गट सरकारमध्ये सहभागी झाला तर आपले महत्त्व कमी होईल, याची जाणीव काँग्रेस पक्षाला आहे. त्यामुळेच अण्णाद्रमुकमधील बंडखोर गटाला सरकारमध्ये सामील करून घ्यायला काँग्रेस विरोध करीत आहे. विजय लोकप्रिय अभिनेते असले, तरी ते राजकारणात नवखे आहेत. त्यामुळे आपले सरकार आधी स्थिर करणे आणि नंतर ते पाच वर्षे चालवणे हे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. हे आव्हान ते आता कसे पेलतात, ते पाहायचे.

९८८१७१७८१७

---

### राज्यातील तरुणाईला अमली पदार्थांचे व्यसन

देशात एकेकाळी पंजाबसारख्या राज्याला ड्रग्ज माफियांची कीड लागली होती. तीच परिस्थिती आता महाराष्ट्र राज्यातही निर्माण झाली आहे. मागील काही वर्षांपासून राज्यामध्ये विशेषतः मुंबई, नागपूर आणि इतर शहरांमध्ये अमली पदार्थांचे मोठमोठे साठे सापडत आहेत. पोलिसांकडून ते साठे जप्त करण्याची प्रक्रिया पार पडत असली तरी त्यामध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांना किरकोळ शिक्षा देऊन सोडले जात आहे. पुढे त्या अमली पदार्थांचे नेमके काय होते, याची माहिती सामान्य जनतेला कधीच उपलब्ध होत नाही. अमली पदार्थांच्या व्यापारातून अब्जावधी रुपयांची उलाढाल होत असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ड्रग्जचे व्यसन लावून समाज उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या अनधिकृत व्यवसायात अनेक मोठे उद्योगपती असल्याचा संशय व्यक्त केला जातो. परंतु पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात यशस्वी ठरत नाहीत. राजकीय लोकांचे हितसंबंधही यामध्ये अडकलेले असू शकतात. समुद्रमार्गे असे ड्रग्जचे साठे राज्यात येण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. इतकेच नव्हे तर महानगरांमध्ये रेव्ह पार्ट्यांची संख्यादेखील फोफावत आहे. अशा अनधिकृत पार्ट्यांमधून अमली पदार्थांची जोरदार विक्री सुरू असते.

अलिकडेच मुंबईतील गोरेगाव उपनगरात उच्चभ्रू वस्तीत झालेल्या अशाच पार्टीचे प्रकरण पोलिसांनी उघडकीस आणले. अलिकडेच दोन जणांचा अशा पार्टीत अमली पदार्थांच्या अतिसेवनाने बळीसुद्धा गेला आहे. म्हणूनच ड्रग्जच्या धंद्यात मुख्य सूत्रधार शोधून काढणे पोलिसांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. गेल्या जानेवारी महिन्यात मुंब्रा परिसरात सत्तावीस कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते. त्यानंतर सातारा जिल्ह्यातील पाचपुतेवाडीतून सहा हजार कोटींचे एमडी ड्रग्ज पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याचबरोबर साकीनाका आणि इतर ठिकाणाहूनही असेच अमली पदार्थांचे साठे जप्त करण्यात आले होते. सरकारने वेळीच कठोर पावले उचलत ड्रग्ज माफियांचे कंबरडे मोडून त्यांची पाळेमुळे शोधून काढली पाहिजेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### शिक्षणाच्या वाटेवरील पाऊल

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने चार हजार वसतिस्थाने घोषित करून वाहतूक सुविधा किंवा भत्ता देण्याची केलेली घोषणा स्वागतार्ह आहे. अनेक विद्यार्थ्यांना आजही डोंगरवाटा, ओढे-नाले पार करून शाळेत जावे लागते. त्यामुळे उपस्थिती कमी होऊन काहींना शिक्षणही सोडावे लागते. अशा परिस्थितीत हा निर्णय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणारा ठरेल. मात्र, केवळ भत्ता न देता प्रत्यक्ष विविध मार्गाने वाहतूक सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाली तर ग्रामीण शिक्षणव्यवस्थेत सकारात्मक बदल घडेल आणि कोणतेही मूल केवळ अंतरामुळे, शाळा मार्गामुळे शिक्षणापासून वंचित राहणार नाही. शाळाबाह्य विद्यार्थिसंख्या निश्चितच कमी होईल.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

### तात्यांच्या हाती धुपाटणे?

सोशल मीडियावरील मराठी मिम्स आणि विनोदी व्हिडीओत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना 'तात्या' असं संबोधलं जातं. त्यांच्या आक्रमक आणि बिनधास्त स्वभावाला अस्सल गावराणी रूपात दाखवून विनोदनिर्मिती करण्याचा सफल प्रयत्न करण्यात येतो. ट्रम्प यांची भाषणे आणि मुलाखतींना डब करून मोठ्या प्रमाणावर व्हायरल करण्यात येत आहे. ट्रम्प यांची बोलण्याची लकब, हातवारे आणि चेहऱ्यावरील रागीट किंवा मिश्कील भाव गावाकडच्या 'तात्यां'सारखी वाटतात. नुकताच डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचा दौरा केला. त्यांची चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत शिखर परिषद बीजिंग येथील 'ग्रेट हॉल ऑफ द पीपल' येथे पार पडली. ट्रम्प यांच्यासोबत टेस्लाचे एलन मस्क, ॲपलचे टिम कूक आणि एनव्हिडियाचे जेन्सन हुआंग इत्यादी अमेरिकेचे दिग्गज उद्योगपती देखील चीन दौऱ्यावर गेले होते. ट्रम्प यांनी दिलेल्या माहितीनुसार, चीन अमेरिकेकडून दोनशे बोईंग विमाने खरेदी करणार असून भविष्यात आणखी साडेसातशे विमाने घेण्याचा चीनचा विचार आहे. चीन अमेरिकेकडून अब्जावधी डॉलर्सचं सोयाबीन आणि इतर शेतीमाल आयात करणार आहे. चीन इराणला कुठलीही लष्करी मदत करणार नाही. होर्मुजची सामुद्रधुनी सर्व जहाजांना मोकळी करण्यासाठी चीन सहायता करेल. या सर्व बाबींना चीनने कुठलाही दुजोरा दिलेला नाही किंवा लेखी दस्तावेज उपलब्ध नाहीत. बैठकीत जिनपिंग यांनी तैवानच्या मुद्यावर ट्रम्प यांना कडक शब्दांत इशारा दिला. चिनी हेरगिरीच्या शक्यतेमुळे दिलेल्या भेटवस्तू अमेरिकेला परतताना विमानात चढण्यापूर्वी डस्टबिनमध्ये टाकण्यात आल्या. चाळीस तासांच्या चीन दौऱ्यामुळे तात्यांच्या हाती नेमकं काय लागलं हा खरा यक्षप्रश्न आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पुढच्या वर्षात 'वर्ल्ड क्लास' असेल जालना रेल्वे स्थानक!

## जालन्याचे रेल्वे स्थानक घेतय राजुरेश्वराचे रूपडे..!

**तभा वृत्तसेवा**
**जालना । सुरेश कवडे पाटील**

प्रवाशांकरिता जालना रेल्वे स्टेशन नव्या रूपात आधुनिक तंत्रज्ञान विकसित पायाभुत सुख सुविधा निर्माण पूर्णनिर्मिर्ती करूण लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. जालना रेल्वे स्टेशनचे बांधकांम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत .

सध्या १८२ कोटी रुपये खर्च करून जालन्यात नूतन रेल्वे स्थानकाच्या इमारतीचे बांधकाम सुरू झाले आहे. या नवीन रेल्वे स्थानकात आंतरराष्ट्रीय विमानतळाप्रमाणे सुविधा मिळणार आहेत. जालना शहराचा मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर विस्तार होत आहे. त्यामुळे एकेकाळी शहराच्या बाहेर असणारे रेल्वेस्थानक हे शहराच्या मध्यभागी आलेले आहे. मात्र, या रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यासाठी एक बाजू आहे. शिवाय जालना रेल्वेस्थानक येथे पीटलाइनसह नवीन रेल्वे सुरू झाल्याने प्रवाशांची संख्या



वाढली आहे. त्यात ड्रायपोर्ट येथून रेल्वेव्दारे माल वाहतूक सुरू होणार आहे. रेल्वेचा सर्वात मोठा बोगदा होणार महाराष्ट्रात! जालना, छत्रपती संभाजी नगर ( औ . बाद ) अन् जळगाव असे जिल्हेही जोडले जाणार त्यामुळे रेल्वे स्थानकाचा विस्तार होणे ही काळाची गरज होती. त्यामुळे माजी खासदार केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी पुढाकार घेऊन नवीन रेल्वे स्थानकासाठी १८२ कोटींचा निधी मंजूर करत कामाचे भूमिपूजन केले होते. आजघडीला रेल्वेस्थानकाच्या दक्षिण बाजूला दोन मजली इमारतीचे काम सुस्थितीत पूर्णत्वास होत आले आहे. तर सध्या उभे असलेल्या रेल्वे स्थानकाची इमारत पाहुण राजुर येथील राजुरेश्वर गणेशमंदीराची प्रतिकृती साकारत आसल्याचे दिसत आहे . येथे नवीन इमारत बांधकाम सुरू केले जाणार आहे. त्यामुळे शहरात पुढील एक ते दीड वर्षात पूर्ण सुविधा असलेले हायटेक रेल्वे स्थानक निर्माण होणार आसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे . नक्कीच या हायवेक रेल्वे स्थानकाचा प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे .

## संक्षिप्त

### परीक्षा केंद्रांभोवती २०० मीटर परिसरात जमावबंदी लागू

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ च्या पार्श्वभूमीवर शहरातील चार परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत जमावबंदी आदेश लागू केला आहे. हा आदेश दि. ३१ मे, २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. प्रशासनाने दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ ही परीक्षा ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच परीक्षेच्या प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. ज्या परीक्षा केंद्रांच्या २०० मीटर परिसरात हा आदेश लागू राहणार आहे, त्यामध्ये पुढील केंद्रांचा समावेश आहे : बद्रीनारायण बारवाले कॉलेज, न्यू एमआयडीसी परिसर, औरंगाबाद रोड, जालना, मत्स्योदरी शिक्षण संस्था, अंकुशराव टोपे कॉलेज, मोतीबाग ओव्हरब्रिजजवळ, जालना, आर.जी.बागडिया आर्ट्स, एस.बी. लाखोटिया कॉमर्स अँड आर. बेनझोनजी सायन्स कॉलेज (जेईएस कॉलेज), दुर्गा माता रोड, जालना, राष्ट्रीय हिंदी विद्यालय, देऊळगाव राजा रोड, जालना आदेशानुसार परीक्षा केंद्रांच्या परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा काळात सर्व सार्वजनिक लाऊडस्पीकर, ध्वनिवर्धक यंत्रणा आणि तत्सम साधनांच्या वापरावरही बंदी घालण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले असून संबंधित आदेशाचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी कळविले आहे.

### जालना तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजाला गती देण्यासाठी तसेच विविध प्रलंबित कामांचा निपटारा करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज तहसील कार्यालय, जालना येथील महसुल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी विशेष सखोल पुर्नरिक्षण कार्यक्रम (ड्खठ) अंतर्गत निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेला. मतदार यादी अद्ययावत करणे, पात्र मतदारांची नोंदणी व त्रुटी दूर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे निर्देश दिले. तसेच जनगणना प्रक्रियेचा आढावा घेत जनगणनेचे काम अचूक व वेळेत पूर्ण करण्याच्या मार्गदर्शक सूचना केल्या. तसेच शासकीय जमिनींवरील अतिक्रमण हटविणे आणि सिलींग जमिनींसंदर्भातील प्रकरणांचाही सविस्तर आढावा घेत, शासकीय जमिनी अतिक्रमणमुक्त करण्याच्या सूचना दिल्या. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू कामांचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुलभ दळणवळणासाठी पाणंद रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रलंबित सिलींग प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याचे निर्देश दिले. यावेळी बैठकीस जालना तहसीलदार छाया पवार, नायब तहसिलदार यांच्यासह तहसील कार्यालयातील विविध विभागांचे कर्मचारी, मंडळ अधिकारी आदींची उपस्थिती होती.

## अंबड प्रशासनाचा गोदावरी पात्रात धडक 'सर्जिकल स्ट्राईक'

### अधिकाऱ्यांसमोरच बीडच्या वाळू माफियांचा निर्लज्जपणे वाळू उपसा; मुसक्या आवळण्यासाठी 'मोक्का' किंवा 'एमपीडीए' लावणार

**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अंबड गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आज दिनांक २० मे २०२६ रोजी अंबड महसूल विभाग आणि भूमी अभिलेख (एढ्ड) विभागाने अत्यंत धाडसी आणि गोपनीय संयुक्त मोहीम राबवली. उपविभागीय दंडाधिकारी *उमाकांत पारधी* आणि तहसीलदार *विजय चव्हाण* यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली ५० ते ६० अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या फौजफाट्याने आज दुपारी १२ ते रात्री ८ वाजेपर्यंत वाळू घाटांमधील बेकायदेशीर खड्ड्यांची मोजणी पूर्ण केली. या कारवाईत बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका प्रशासनालाही पाचारण करण्यात आले होते.

वाळू माफियांना कारवाईची भनक लागू नये आणि प्रशासकीय हालचालींचे लोकेशन लीक होऊ नये म्हणून सर्व ५० ते ६० अधिकारी-कर्मचारी अत्यंत गोपनीयरीत्या अंबड येथील ए.पी.एम.सी. (-झचउ) आवारात जमा झाले. तेथून खाजगी वाहनांद्वारे वेगवेगळ्या दिशांनी मार्गक्रमण करत साष्टपिंपळगाव घाट क्रमांक १ व २ ला चारही बाजूंनी वेढा घालण्यात आला. अचानक झालेल्या या छाप्यामुळे तस्करांची पळापळ झाली. घटनास्थळी भूमी अभिलेख विभागाच्या तीन



अद्ययावत पथकांद्वारे 'ईटीएस' (एढ्ड) मोजणी करून बेकायदेशीर उपशाचे मोजमाप घेण्यात आले. अवैध उत्खनन बाबत सदर कारवाईची व्याप्ती आणि आंतरजिल्हा सीमा लक्षात घेऊन अंबडचे उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांनी बीडच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना या मोहिमेत समाविष्ट होण्यासाठी विनंती केली होती. काही अपरिहार्य अडीअडचणींमुळे बीडचे उपविभागीय अधिकारी स्वतः उपस्थित राहू शकले नाहीत, मात्र त्यांनी *गेवराईचे तहसीलदार* आणि संबंधित तलाठ्याला या संयुक्त कारवाईसाठी घटनास्थळी पाठवले. गेवराईचे तहसीलदार आणि त्यांच्या पथकाच्या समक्ष गोदावरी पात्रात सुरू असलेल्या या अवैध उत्खननाचा आणि हद्द उल्लंघनाचा संपूर्ण प्रकार अंबड प्रशासनाने निर्दशनास आणून दिला.

कारवाई दरम्यान गंभीर बाब समोर आली की, बीड जिल्ह्यातील गेवराई (सावरगाव) येथील टेंडरधारकाने जालना जिल्ह्याची सीमा ओलांडून अंबड तालुक्यातील गांधारी घाट च्या हद्दीत घुसखोरी केली आहे. त्याचीही एढ्ड मोजणी करण्यात आलेली आहे. वाळू माफियांनी बीडच्या बाजूने थेट नदीपात्रात बेकायदेशीर रस्ता तयार करून त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर वाळूची चोरी आणि वाहतूक सुरू केली होती.

ही बाब सुद्धा गेवराई तहसीलदार यांच्या निर्दशनास आणून देण्यात आले आहे. अंबडच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी हा अवैध रस्ता आणि बेकायदेशीर वाहतुकीची गंभीर गेवराईच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या लेखी निर्दशनास आणून दिली आहे. तसेच हिरीहीं पिंपळगाव येथील घाट क्रमांक दोन येथील रेती कंत्राटदार यांनी राक्षसभुवन येथून अवैध व विनापरवानगी रस्ता बनवून रेतीची चोरी केल्याचेही दिसून आले तसेच ही बाब सुद्धा गेवराई तहसीलदार यांच्या निर्दशनास समक्ष आणून देण्यात आले. मौजे डोमलगाव घाट क्रमांक १ आणि माळसपिंपळगाव येथे पाहणी सुरू असताना वाळू माफियांचा अत्यंत मुजोर आणि निर्लज्जपणा पाहायला मिळाला. नदीत पाणी असल्यामुळे अंबडचे अधिकारी पलीकडे येऊ शकत नाहीत, या भ्रमात राहून तस्करांनी थेट उपविभागीय दंडाधिकारी आणि तहसीलदार यांच्यासमोरच लोडरच्या साहाय्याने हायवा ट्रकमध्ये वाळू भरणे सुरूच ठेवले. अंबड प्रशासनाने या संपूर्ण प्रकाराचे अत्यंत अचूक व्हिडिओ चित्रीकरण आणि फोटो*गोळा केले. हे सर्व पुरावे बीड आणि गेवराईच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना पाठवून संबंधित तस्करांविरुद्ध तात्काळ कडक फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांत केणीचे दोरखंड कापून गुन्हे दाखल केल्याने वाळू माफिया बिथरले आहेत. आज गुन्हे नोंद झाल्यानंतर मुख्य सूत्रधार सुनील बालूर आणि त्याच्या टोळीने फिर्यादी मंडळ अधिकारी बामनावत यांना फोनवरून थेट धमक्या दिल्या आहेत. यावरून वाळू माफियांना कायद्याचा कोणताही धाक उरलेला नाही हे स्पष्ट होते. बीड जिल्हा प्रशासनाला कारवाईसाठी यापूर्वी २ ते ३ स्मरणपत्रे देऊनही ठोस पावले उचलली गेली नाहीत. त्यामुळे जोपर्यंत या संघटित गुन्हेगारांवर 'मोक्का' किंवा 'एमपीडीए' सारखी कठोर प्रतिबंधात्मक कारवाई पोलीस आणि महसूल प्रशासनामार्फत केली जात नाही, तोपर्यंत या चोरीला पायबंद बसणे कठीण आहे.

यापूर्वीच साष्टपिंपळगाव येथील दोन्ही घाटधारकांना 'कारण दाखवा नोटीस' बजावण्यात आली आहे. भूमी अभिलेख विभागाचा तांत्रिक मोजणी अहवाल प्राप्त होताच दंडाची आकारणी केली जाईल. तसेच व्हिडिओ पुराव्यांच आधारे अजून सविस्तर माहिती घेऊन पुढील सक्त कारवाई करण्यात येणार आहे सदर धडक मोहीम जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व अपर जिल्हाधिकारी *रमेश मिसाळ* यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अशोक कोन्ते, मिटकरी, मुंडे, नायब तहसीलदार एकनाथ भोजने, मंडळ अधिकारी कल्याण माने, कृष्णा येडके, तलाठी सुनील उंबरहंडे, लोणीकर, लव्हाळे, कोतवाल आणि स्थानिक पोलीस पाटील यांनी मोठी मेहनत घेतली. यामध्ये मंडळ अधिकारी कल्याण माने, तलाठी गणेश खरात आणि राजु वैद्य यांनी मेहनत घेतली.

## भोकरदनमध्ये शिवसेनेचा शक्तीप्रदर्शनात्मक समर्थन कार्यक्रम

### संजय राऊतांवरील आरोपांमागे राजकीय सूडभावना? -महेश पुरोहित

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

राज्यातील सध्याच्या राजकीय वातावरणात आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू असताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे राज्यसभेचे खासदार तथा सामनाचे मुख्य संपादक संजय राऊत यांच्या समर्थनार्थ भोकरदन शहरात शिवसैनिकांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. महात्मा फुले चौक येथे आयोजित कार्यक्रमात राऊत यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून पुष्पवृष्टी करण्यात आली.



यावेळी बोलताना शहरप्रमुख महेश पुरोहित यांनी संजय राऊत यांच्याविरोधात सुरू असलेल्या घडामोडींना राजकीय षडयंत्र असल्याचा आरोप केला. शिवसेनेचा आवाज बुलंदपणे मांडणाऱ्या नेत्याला बदनाम करण्यासाठी काही भाडोत्री कार्यकर्त्यांचा वापर करत आहेत. मात्र शिवसैनिक कोणत्याही दबावाला बळी पडणार नाहीत, असे ते म्हणाले. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये संजय राऊत हे सातत्याने आक्रमक भूमिका घेत असल्याने ते सत्ताधाऱ्यांच्या निशाण्यावर असल्याची चर्चा शिवसैनिकांमध्ये दिसून आली. या कार्यक्रमातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने ग्रामीण भागातही आपली संघटनात्मक ताकद कायम असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत पक्षनिष्ठा व्यक्त केली. अफवा आणि सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या प्रचाराला बळी पडू नका, असे आवाहनही पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना केले. यावेळी प्रदीप पैठणकर, रवि सुरसे, संतोष सुरडकर, बालू जाधव, अशोक साबले, कृष्णा तराल, योगेश पुंड, बबन शिंदे, आकाश सुरडकर, प्रल्हाद ओमकार, राजू शैलके, दत्तू सुरडकर, नदन कचके, संजय आक्से, संदीप लाड, अन्ना सुरडकर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेती मशागतीसाठी डिझेल द्या अन्यथा तीव्र आंदोलन -मा.आ.चंद्रकांत दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**



सध्या राज्यात सुरू असलेल्या पेट्रोल-डिझेल टंचाईमुळे ग्रामीण भागातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले असून खरीप हंगामाच्या तोंडावर ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याने शेतीची सर्व कामे ठप्प होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर प्रश्नाची तात्काळ दखल घेत मा.आ. चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी मा.जिल्हाधिकारी जालना तसेच उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांना तातडीने ट्रॅक्टरकरिता कॅनमध्ये डिझेल भरण्यास परवानगी द्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

सदर निवेदनात मा. आ. चंद्रकांत दानवे यांनी स्पष्ट केले की, शासनाने इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल देण्यावर निर्बंध घातले असले तरी त्याचा सर्वाधिक फटका सामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. आज शेतकरी दिवस-रात्र शेतात राबत असून नांगरणी, वखरणी, पेरणी यांसारखी अत्यावश्यक कामे सुरू आहेत. अशा वेळी ट्रॅक्टरसाठी डिझेल उपलब्ध झाले नाही तर संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतांपासून पेट्रोल पंप १५ ते २० किलोमीटर अंतरावर आहेत. खराब रस्ते, दुर्गम शिवार आणि ट्रॅक्टरच्या छोट्या टाक्या यामुळे वारंवार पेट्रोल पंपावर जाणे शक्य होत नाही. अनेक वेळा ट्रॅक्टर शेतातच बंद पडत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शासन एका बाजूला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या घोषणा करते, तर दुसऱ्या बाजूला ट्रॅक्टरसाठी डिझेल नाकारून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याचा संतप्त आरोप मा. आ.चंद्रकांत दानवे यांनी केला आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे, गुन्हेगार नाही. काही अपवादात्मक घटनांमुळे संपूर्ण शेतकरी वर्गाला वेठीस धरणे अन्यायकारक आहे. प्रशासनाने वास्तव परिस्थिती समजून घेत शेतकऱ्यांचे आधारकार्ड, ७/१२ उतारा, ट्रॅक्टरची कागदपत्रे किंवा कृषी वापराची खात्री करून कॅनमध्ये डिझेल देण्यास तात्काळ परवानगी द्यावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे. तसेच, खरीप हंगामातील शेतीची कामे खोळंबल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा आक्रमक इशाराही मा. आ. चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी दिला आहे.

## साडेतेहतीस लाखांचा गुटखा पोलिसांनी केला गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्या प्रतिबंधीत असलेला व मानवी शरीरास घातक असलेला राजनिवास व विमल कंपनीचा गुटखा व जाफराणी जर्दा तसेच वि - ०१ तंबाखु असा बऱ्हाणपुर मध्यप्रदेश येथुन जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील किनगाव फाटा या भागत अवैध विक्री साठी येत असल्याची गुप्त व खात्रीशीर माहिती पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधु सर यांना मिळाल्याने त्यांनी पोलीस ठाणे चंदनझिराचे पोलीस निरीक्षक श्री बाळासाहेब पवार यांना कारवाई बाबत सुचना देवुन पोलीस ठाणे चंदनझिरा चे सहा. पोलीस निरीक्षक स्नेहा करेवाड पोलीस उप निरीक्षक रवि देशमाने पोहेकॉ/ कृष्णा तंगे व



पोअं/नवनाथ पाटील यांचे पथक तयार करुन सदर पथक तात्काळ बदनापुर भागातील सोमठाणा रोडवर जावुन दि.२०/०५/२०२६ ठिक १५.५० वा सोमठाणा फाटा ता. बदनापुर जि. जालना येथे पथकाने सापळा लावुन बऱ्हानपुर येथुन गुटखा भरुन आलेले बोलेरो पिकअप वाहण क्र. एम. एच -२१ बि. एच - ४७३२ हीस थांबवुन गाडीतील आरोपी नामे - १) ऋषिकेश काकासाहेब कताडे, वय - २६ वर्षे, रा. खांडी अंतरवाली ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर व त्याचा साथीदार २) अशोक शिवाजी तायडे वय ३० वर्षे, रा.रामसगाव ता. घनसावंगी जि. जालना यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातील वाहणातुन खालील वर्णनाचा माल ९,६०,०००/- रुपये किंमतीचा विमल पान मसाला, ३१,४६०/- रुपये किंमतीचा वि - १ तंबाखु चा किंग पॅक, ३,८८,८०० /- रुपये किंमतीचे के. एन- १ जाफराणी जर्दा, ४०,०००/- रुपये किंमतीचे वि -१ बिग तंबाखु, ६,२४,०००/- रुपये किंमतीचे केशर युक्त विमल पान मसाला, ५,०६,२५०/- रुपये किंमतीचे राज निवास सुगंधीत पान मसाला, ८,००,०००/- एक पांढऱ्या रंगाचे महिंद्रा कंपनीचे बोलेरो पिकअप ज्याचा क्र. एम. एच -२१ बि.एच - ४७३२ असा असलेला जु.वा. किं.अं. एकुण ३३,५०,५१० /- येणे प्रमाणे यणे प्रमाणे मुद्देमाल मिळुन आल्याने त्यांचेकडे चौकशी केली असता सदरचा माल हा ताराचंद भागुजी भोजने रा. जामखेड ता. अंबड जि.जालना याने विक्री साठी बऱ्हानपुर येथुन मागवला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर गुटखा कारवाई प्रकरणी सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती स्नेहा करेवाड यांचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे बदनापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री, तेघबीर सिंग, संधु, सहा. पोलीस अधीक्षक श्रीमती, जानव्ही शेखर, उप विभागीय पोलीस अधीकारी श्री नितीन कटेकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री बाळासाहेब पवार यांचे नेतृत्वात चंदनझिरा पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक, स्नेहा करेवाड, पोलीस उप निरीक्षक, रवि देशमाने, पोहेकॉ /कृष्णा तंगे व पोका / नवनाथ पाटील यांचे पथकानी केली आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### माहेरहून पैसे आणण्यासाठी विवाहितेचा छळ; चौघांविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दिनांक २१ मे २०२६**

व्यवसायाकरिता माहेरहून १० लाख रुपये घेवून ये असा तगादा लावत विवाहितेचा शारीरिक,मानसिक छळ करुन पतीने दुसरे लग्न केल्याप्रकरणी पती प्रेमनाथ भगवान इंगोले, सासू सुमित्रा भगवान इंगोले, दीर दादाराव भगवान इंगोले,जाउ जयश्री दादाराव इंगोले (सर्व रा.तेली गल्ली सांगोला) यांच्यावर मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी माया इंगोले (वय २७ ,सध्या रा.गोणेवाडी) हिचा विवाह दि.१२ जुलै २०२० रोजी सांगोला येथील प्रेमनाथ इंगोलेशी झाला होता. लग्नावेळी फिर्यादीच्या वडिलांनी कपडे, एक तोळा सोन्याचे गंठण,एक तोळा सोन्याचे लॉकेट व मानपान केला होता. फिर्यादीचे पती हे यात्रेच्या ठिकाणी पाळणे लावून कमाई करत होते. लग्नानंतर साधारणत: आठ दिवस फिर्यादीस सासरी चांगले नांदवले, त्यानंतर नवरा ,सासू,दीर,जावू यांनी पाळणे खरेदी करण्याकरिता माहेरहून १० लाख रुपये घेवून ये असे म्हणून फिर्यादीचा शारीरिक, मानसिक छळ केला. पतीने दि.३० एप्रिल २०२६ रोजी खरसुंडी येथील ज्योती माणिक शिंदे हिच्याशी दुसरे लग्न केले. याबाबत फिर्यादीने पतीस विचारणा केली असता शिवीगाळी, दमदाटी करुन तिला राहते घरातून हाकलून दिले. त्यानंतर ६ मे रोजी फिर्यादी ही माहेरी गोणेवाडी येथे आई वडिलाकडे राहत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. प्रकरणाचा तपास पोलीस करीत आहेत.

### भांडणे मिटवण्यास गेलेल्या वृध्दास केले गंभीर जखमी

**मंगळवेढा दिनांक २१ मे-**

भांडणे सोडविण्यास गेलेल्या वृद्धास डोक्यात काठी मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी पंढरीनाथ इंगवले (रा.पाठखळ) याच्यावर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी भारत भोसले (वय ७०) यांचा मुलगा प्रताप व सून कल्पना यांची दि.१४ मे रोजी रात्री ८ वाजता भांडणे लागली होती. त्यावेळी भांडणे मिटविण्याकरिता फिर्यादी हे भारत खुळे यांच्या वस्तीवर गेल्यावर भांडणे मिटवत असताना पंढरीनाथ इंगवले याने चिडून जावून माझे मुलीस तुम्हीच त्रास देत आहात, तुम्हाला बघून घेतो अशी धमकी, शिवीगाळ करुन काठीने डोक्यात मारुन गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. प्रकरणाचा तपास पोलीस नाईक बाबर हे करीत आहेत.

### त्नीस आणावयास निघालेल्या पतीचा अपघातात जागीच मृत्यू

**मंगळवेढा दिनांक २१ मे-**

सद्गुरुच्या बैठकीस गेलेल्या पत्नीला आणावयास मोटर सायकलवर चाललेल्या पतीस मंगळवेढा-आंधळगाव या महामार्गावर कारने पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात नारायण साधू चव्हाण (वय ६३,रा.शेलेवाडी) यांचा गंभीर जखमी होवून जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी संतोष नारायण चव्हाण यांचे वडील तथा मयत नारायण साधू चव्हाण हे दि.१९ रोजी सकाळी १०.३० वाजता आंधळगाव -मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावरुन जात असताना मोटर सायकल क्र. एम.एच.१३ ए. आर.४३०९ नडगिरे हॉस्पिटलजवळ कार क्र. एम.एच.१९ ई.जी. ८३२० वरील चालकाने त्याच्या ताब्यातील कार निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवून स्कूटी गाडीचे दहा हजाराचे नुकसान करुन नारायण चव्हाण यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. तसेच अपघाताची खबर न देता तो निघून गेला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार धनंजय आवताडे हे करीत आहेत.



### महापालिकेत अधिकाऱ्यांनी घेतली दहशतवादविरोधी प्रतिज्ञा

**सोलापूर, दि.२१ मे-**

सोलापूर महानगरपालिकेतर्फे आज दि. २१ मे रोजी 'दहशतवाद विरोधी दिन' पाळण्यात आला. यावेळी सर्वांनी देशात शांतता टिकवून ठेवण्यासाठी तसेच दहशतवादी विचारसरणीच्या विरोधात ठामपणे उभे राहण्याची 'दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा' घेतली. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २१ मे रोजी हा दिवस पाळला जातो. याच पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात महानगरपालिकेच्या सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दहशतवादाचा निषेध व्यक्त केला. हा कार्यक्रम अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी नियंत्रण अधिकारी तपन डंके, लाईट विभाग प्रमुख राजेश परदेशी, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, संगणक विभागप्रमुख मतीन सय्यद यांच्यासह महानगरपालिकेचे इतर सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महापालिकेतर्फे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि.२१ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौरांच्या कार्यालयात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, चंद्रकात दोतुल, जयप्रकाश आमनगी,सिद्धू तिमिगार, अशोक खडके, बाळू बळे, चेतन गदगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# टायपिंग टेस्ट रद्द, गुणवत्तेच्या जोरावरच मिळणार सरकारी नोकरी

## एम.पी.एस.सी.चा मोठा निर्णय; लाखो स्पर्धा परीक्षार्थींना मोठा दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एम.पी.एस.सी.) गट-क सेवेतील लिपिक टंकलेखक आणि कर सहाय्यक संवर्गाच्या भरती प्रक्रियेत मोठा व ऐतिहासिक बदल करत टंकलेखन कौशल्य चाचणी रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आयोगाच्या २४ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे राज्यभरातील लाखो स्पर्धा परीक्षार्थींना मोठा दिलासा मिळाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील हजारो उमेदवारांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे.

यापूर्वी मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवारांना स्वतंत्र टंकलेखन प्रात्यक्षिक परीक्षा द्यावी लागत होती. या परीक्षेत मराठी अथवा इंग्रजी टंकलेखनातील वेग आणि अचूकता तपासली जात होती. मात्र, अनेक उमेदवारांकडे शासनमान्य टंकलेखन प्रमाणपत्र असतानाही प्रत्यक्ष कौशल्य चाचणीत छोट्या चुका झाल्याने त्यांची अंतिम निवड हुकत होती. परिणामी, मुख्य परीक्षेत चांगले गुण मिळवूनही अनेक गुणवंत उमेदवारांना संधीपासून वंचित राहावे लागत होते.

आता आयोगाने ही प्रात्यक्षिक परीक्षा पूर्णपणे रद्द केल्यामुळे मुख्य परीक्षेनंतर थेट अंतिम गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. उमेदवारांकडे आवश्यक असलेली मराठी ३० शब्द प्रति मिनिट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट टंकलेखन प्रमाणपत्रे नियुक्ती प्रक्रियेवेळी संबंधित विभागामार्फत पडताळली जाणार आहेत. त्यामुळे भरती प्रक्रियेतील अतिरिक्त टप्पा कमी होऊन निकाल जाहीर होण्यास होणारा विलंबही टळणार आहे.

या निर्णयामुळे भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुटसुटीत आणि वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील उमेदवारांना वारंवार होणारा प्रवास, परीक्षा केंद्रांचा ताण आणि प्रात्यक्षिक परीक्षेची भीती यापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

या निर्णयामुळे आता विद्यार्थ्यांचे लक्ष केवळ मुख्य परीक्षेतील गुणवत्तापूर्ण तयारीवर केंद्रित होणार असून, स्पर्धा परीक्षेच्या प्रक्रियेत एक महत्त्वाचा आणि वादग्रस्त टप्पा अखेर इतिहासजमा झाला आहे

> टंकलेखन प्रमाणपत्र असूनही केवळ प्रात्यक्षिक परीक्षेमधील तांत्रिक चुका उमेदवारांच्या भवितव्यावर परिणाम करत होत्या. आयोगाने घेतलेला निर्णय हा गुणवत्तेला न्याय देणारा आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढणार आहे.
>
> **प्रशांत शिरगुर,** राज्य उपाध्यक्ष, स्पर्धा परीक्षा संघटना

# ३१ मे रोजी श्री स्वकुळसाळी समाज वधू-वर पालक परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे**

श्री स्वकुळसाळी समाज सोलापूर ज्ञाती विठ्ठल मंदिर, बेगम पेठ यांच्यावतीने रविवार दि. ३१ मे रोजी सकाळी १० वाजता अक्कलकोट रोड येथील श्री महालक्ष्मी बँक्वेट, एमआयडीसी, सोलापूर येथे भव्य देशपातळीवरील वधू-वर पालक परिचय मेळावा होत असल्याचे अध्यक्ष परमेश्वर गदगे यांनी सांगितले.

गदगे पत्रकार परिषदेत बोलत होते. मेळाव्याच्या उद्घाटनासाठी उद्योगपती उदयकुमार दुधाणे उपस्थित राहणार आहेत. कौटुंबिक समुपदेशक सोनाली कोदे-वाई यांचे विशेष मार्गदर्शन सत्र असणार आहे. लग्नानंतर सुखी संसार कसा टिकवावा, मतभेद कसे हाताळावेत आणि एकमेकांना समजून घेण्याची गरज यावर त्या मार्गदर्शन करणार आहेत.

मेळाव्यासाठी ५०० उमेदवारांनी नोंदणी केली आहे. ६० टक्के उमेदवार शहरी, तर ४० टक्के ग्रामीण व निमशहरी भागातील आहेत. ग्रामीण भागातील पालकांची अडचण लक्षात घेऊन ऑफलाईन नोंदणी केंद्रांची सुविधा दिली आहे. तरुणांसाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे बायोडाटा व फोटो अपलोडची व्यवस्था केली आहे. घटस्फोटीत, विधूर-विधवा तसेच दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्विवाहासाठी प्रयत्न केले आहेत, असे परिचय मेळावा समितीचे मोहन काजळे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस ॲड. ज्ञानेश्वर डिंगणे, अंबरनाथ सरवदे, ज्ञानेश्वर एडके, आनंद कोंगे, यशवंत एकबोटे, अमरनाथ सपात आदी उपस्थित होते.

# मंदिर परिसरातील रस्ते, नगरप्रदक्षिणा मार्ग होतायेत प्रशस्त



## पंढरपूरात नगरपालिकेकडून अतिक्रमण विरोधी कारवाईस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ मे -**

पंढरपूर नगरपालिकेने शहरातील विठ्ठल मंदिर परिसर, नगरप्रदक्षिणा मार्ग येथे अतिक्रमण विरोधी कारवाई सुरु केली आहे. पोलिस बंदोबस्तात कारवाई केल्यामुळे अतिक्रमण करणाऱ्या व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. पालिकेच्या कारवाईमुळे सध्या मंदिर परिसरातील रस्ते प्रशस्त आणि मोकळे वाटू लागले आहे. नागरिकांसह भाविकांमधूनही समाधान व्यक्त होत आहे.

सध्या अधिकमास सुरु असल्यामुळे पंढरपूरात दररोज भाविकांची मांदियाळी आहे. परिणामी शहरात वारंवार वाहतूकीची कोंडी निर्माण होत होती. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात तर अतिक्रमणामुळे भाविकांना रस्त्यावरुन चालणेही जिकिरीचे होवून बसले होते. मंदिर परिसरात तात्पुरत्या व्यापाऱ्यांनी रस्त्यांवरच मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करुन अक्षरश: रस्ते व्यापून टाकले होते. या तात्पुरत्या स्वरुपात व्यापार करणाऱ्यांमुळे मंदिर परिसरातील कायमस्वरुपी दुकानदार देखील वैतागून गेलेले होते. कारण त्यांच्या दुकानांसमोर हातगाडे लावून ही मंडळी व्यवसाय करीत होती. बाहेरुन आलेल्या भाविकांची गर्दी व अतिक्रमणामुळे वारंवार वाहतूकीची कोंडी रोज तंटे- बखेडे निर्माण करत होते. यामुळे शहरातील नागरिकां बरोबरच परगावाहून येणारे भाविक देखील वैतागून गेलेले होते. त्यामुळे पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी पोलिसांच्या मदतीने शहरात बुधवार पासून अतिक्रमण विरोध मोहिमेस प्रारंभ केला. स्वत: मुख्याधिकारी तसेच येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे जातीने रस्त्यावर थांबुन अतिक्रमणे काढण्याचे आवाहन करीत आहेत. पोलिसांचा बंदोबस्त असल्यामुळे अतिक्रमण पथकातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना देखील अतिक्रमण केलेल्या व्यापाऱ्यांकडून फारसा विरोध होत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे विठ्ठल मंदिर परिसरातील रस्ते, नगरप्रदक्षिणा मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौफाळा आदी रस्ते आता मोकळे दिसु लागलेले आहेत.

ही अतिक्रमण मोहिम काही दिवसांपूरतीच राबवु



नये. त्यामध्ये सातत्य ठेवावे नाही तर अतिक्रमण करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून पुन्हा अतिक्रमणे करुन रस्त्यांवर अडथळे निर्माण केले जावू शकतात, अशी भावना सुज्ञ नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

> **गंध लावणाऱ्या मुलांचा उपद्रव**
>
> विठ्ठल मंदिर परिसरात गंध लावण्याऱ्या मुलांच्या संख्येत कमालीची वाढ झालेली दिसत आहे. ही मुले विठ्ठल दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कमालीचे हैराण करताना दिसतात. त्यामुळे अनेक वेळा भाविकांना या मुलांकडून नाहक त्रास दिला जातो. अनेकदा वादाचे प्रसंग देखील उद्भविताना दिसून येतात. त्यामुळे पोलिसांनी गंध लावणाऱ्या मुलांना देखील शिस्त लावण्याची गरज असल्याचे भाविकांमधून बोलले जात आहे.

> **अतिक्रमण पथकाने कायमच दक्षता घ्यावी**
>
> पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने सातत्याने अशा प्रकारे मंदिर परिसरात फिरुन अतिक्रमणे होणार नाहीत, फेरीवाले लोक रस्ता व्यापून आपल्या व्यवसाय करणार नाहीत, हातगाड़ीवाले रस्त्यावर हातगाड्या लावून आपल्या मालाची विक्री करणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. जर पालिकेकडून दुर्लक्ष झाले तर लगेचच व्यापारी पुन्हा अतिक्रमण करुन रस्ता व्यापुन टाकण्यास मागेपुढे पहात नाहीत.

# छोट्याशा मानेगावातून अनेक उच्च पदस्थ अधिकारी!

## बार्शी तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.२१ मे -**

बार्शी तालुक्यातील वैरागपासून अवघ्या दोन-तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या मानेगाव या छोट्याशा गावाने आज आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले आहे. गावाने प्रशासकीय सेवेतील अधिकारी घडवण्याची मोठी परंपरा निर्माण केली आहे. गावातील अनेक तरुण एकाच वेळी मोठ्या हुद्द्यांवर कार्यरत आहेत.

मानेगावातील अनेक तरुण प्रशासकीय सेवेत राज्याच्या विविध भागांत महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. किरण डाके: मुख्याधिकारी (गट-अ)-तुळजापूर नगरपरिषद, पृथ्वीराज ताटे: सहाय्यक पोलीस निरीक्षक-सातारा, मारुती ताटे : संरक्षण अधिकारी-माढा, कपिल कानडे : कर निरीक्षक - मंत्रालय- मुंबई, बालाजी ताटे : कृषी अधिकारी - बारामती, अविनाश डाके: लिपिक - कोल्हापूर न्यायालय, सोनल कानडे - प्रकल्प अधिकारी - आदिवासी विभाग आयुक्तालय - नाशिक. आमच्या गावातून जेव्हा कोणी अधिकारी होतो, तेव्हा तो फक्त एका कुटुंबाचा नसून संपूर्ण गावाचा अभिमान असतो, अशी अभिमानाची भावना ग्रामस्थ व्यक्त करतात.

> **शिक्षकांचे गाव आणि अधिकाऱ्यांची खाण**
>
> मानेगावची ओळख केवळ शेतीपुरती मर्यादित नसून, येथे शिक्षक वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. ९ ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांच्या एकजुटीने गावाचा विकास होत असतानाच, दुसरीकडे प्रशासकीय पातळीवर गावातील मुले चमकत आहेत. १५०० लोकसंख्या असलेल्या या छोट्याशा गावातून एकाच वेळी क्लास-१ आणि क्लास-२ दर्जाचे इतके अधिकारी असणे, ही बाब पंचक्रोशीत कौतुकाचा विषय ठरत आहे. या सर्व अधिकाऱ्यांचे बार्शी तालुका आणि मानेगाव परिसरातून अभिनंदन होत असून, या सुपुत्रांनी आपल्या कर्तृत्वाने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# महिला एजंटच्या कुचराईपणामुळे महिला प्रवाशांना मिळेनात स्मार्ट कार्ड

## प्रवाशी वर्गातून संताप

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दिनांक २१ मे-**

मंगळवेढा बसस्थानकावर महिला एजंटच्या कुचराईपणामुळे महिला प्रवाशी व जेष्ठ नागरिक यांना एन.सी.एम.सी.कार्ड देण्याचे काम मागील काही दिवसापासून कामकाज ठप्प आहे. परिणामी कार्ड काढण्यासाठी येणाऱ्या महिला प्रवासी व जेष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

महिला प्रवाशांची ५०० ते ६०० कार्ड येथे आली आहेत. त्यांना ॲक्टीव्हेट न केल्यामुळे महिला प्रवासी बसस्थानकाचे उंबरठे झिजवत आहेत. दरम्यान या घटनेबाबत मंगळवेढ्याचे आगार प्रमुख गुरुनाथ रणे यांनी सोलापूरचे विभागीय नियंत्रकांना कळवून नव्याने प्रतिनिधी नेमून येथे जेष्ठ नागरिक व महिला प्रवाशांची होणार गैरसोय दूर करावी अशी मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एस.टी. प्रवाशी महिला व जेष्ठ नागरिक यांना स्मार्ट कार्ड अर्थात एन.सी.एस.सी.कार्ड नोंदणीकरिता सोलापूर जिल्ह्यासाठी अधिकृत प्रतिनिधी (एजंट) श्रीकांत सद्दू यांची नेमणूक केली आहे. त्यांनी मंगळवेढा बसस्थानकासाठी उपएजंट सुष्मा गिड्डे या महिलेची नेमणूक केली आहे. सदर महिला एजंटने काही दिवसापासून येथील कामकाजच बंद केल्यामुळे महिला प्रवाशी व जेष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेणे मुश्किल बनले आहे. आगार प्रमुखांनी वारंवार सदर महिलेस कॉल करुन कामकाजाबाबत सुचना करुनही त्याकडे साफ दुर्लक्ष केले जात आहे. फोनही उचलला जात नसल्याच्या तक्रारी आहेत.

सध्या ७०० ते ८०० प्रवाशांची नोंद कार्डासाठी झाली असून सध्या ५०० ते ६०० कार्ड तयार होवून ॲक्टीव्हेट करण्यासाठी आले आहेत. हे कार्ड ॲक्टीव्हेट करण्याची जबाबदारी संबंधित महिला एजंटची असताना अद्यापही त्यांनी ते कार्ड ॲक्टीव्हेट केले नसल्यामुळे बसस्थानकावर कार्डचा ढिगारा पडून आहे. कार्ड त्वरीत मिळावे यासाठी महिला प्रवासी, जेष्ठ नागरिक बसस्थानकाचे उंबरठे झिजवत आहेत.

> **लोकप्रतिनिधीकडूनही वारंवार आगारप्रमुखांना विचारणा**
>
> या घटनेबाबत लोकप्रतिनिधीकडूनही वारंवार आगारप्रमुखांना विचारणा होत आहे. या सर्व तक्रारीमुळे प्रशासकीय कामकाजात अडथळा येत असल्याचे आगार प्रमुखांनी सोलापूर विभागीय नियंत्रकाकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# वाळूजच्या सुपुत्राची यशस्वी भरारी

## सनील धनवे यांची सपोनि पदावरुन पोलिस निरीक्षक पदी पदोन्नती



**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि २१ मे -**

मोहोळ तालुक्यातील वाळूज येथील सनील धनवे यांनी आपल्या जिद्द, परिश्रम आणि कार्याच्या बळावर महाराष्ट्र पोलीस दलात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आता पोलीस उपनिरीक्षक पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) पदावर पदोन्नती मिळवली आहे.

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण वाळूज येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण वाळूज प्रशाला हायस्कूलमध्ये पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेतले. लहानपणापासूनच शिस्त, अभ्यासू वृत्ती आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द असलेल्या सनील धनवे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी प्रथम प्रयत्नातच एप्रिल २०१५ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पद मिळवले.

२०१५-१६ या कालावधीत त्यांनी नाशिक येथे प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षणानंतर त्यांची पहिली नियुक्ती कवठेमहांकाळ (जि. सांगली) येथे झाली. त्यानंतर गोंदिया आणि गडचिरोली या संवेदनशील भागात सेवा बजावली. गडचिरोली येथे साडेतीन वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी छत्तीसगड व मध्यप्रदेश सीमेलगतच्या नक्षलग्रस्त भागात अनेक धाडसी मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. या काळात त्यांनी महाराष्ट्र पोलिसांच्या विशेष अँटी-नक्षल दलात एक वर्ष सेवा बजावत नक्षलवाद्यांविरोधातील विशेष मोहिमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली.

जंगल युद्धतंत्र, विशेष ऑपरेशन्स आणि नक्षलविरोधी मोहिमांमधील त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत केंद्र शासनाच्या गृह खात्याकडून सन २०२२-२३ मध्ये आंतरिक सेवा सुरक्षा पदक प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या धाडसी आणि समर्पित सेवेची पावती मानला जात आहे. यानंतर त्यांनी सालेकसा पोलीस स्टेशन येथे अडीच वर्षे सेवा बजावली. पुढे पुणे जिल्ह्यातील नारायणगाव पोलीस स्टेशन येथे साडेतीन वर्षे एक कर्तव्यदक्ष, दबंग आणि जनतेशी संवेदनशीलतेने वागणारा अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली. त्यानंतर मंचर पोलीस स्टेशन येथे दोन वर्षे अनेक महत्त्वपूर्ण प्रकरणांचा तपास केला.

> **प्रामाणिक सेवा, धाडसी कार्यामुळे मिळवली बढती**
>
> महाराष्ट्र पोलीस दलात पीएसआय पदावरून पीआय पदावर पदोन्नती मिळवण्यासाठी उत्कृष्ट सेवा अभिलेख, समाधानकारक सेवाकाल, विभागीय मूल्यांकन आणि सेवाज्येष्ठता आवश्यक असते. सनील धनवे यांनी आपल्या प्रामाणिक सेवा, धाडसी कार्य आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर ही मानाची पदोन्नती मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे वाळूज गावासह संपूर्ण मोहोळ तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# विशेष आर्थिक पॅकेजसाठी पुरग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे -**

उमरी,धर्माबाद ,नायगाव आणि बिलोली तालुक्यातील शेतकरी तब्बल ४० वर्षापासून न्यायाच्या प्रतीक्षेत असताना प्रशासनाकडून कसलीही दखल घेण्यात आली नसल्याने प्रशासनाला जागा करण्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. या मोर्चात चारही तालुक्यातील हजारो शेतकरी बांधव सामील झाले होते.

तेलंगणा राज्यातील पोचमपाड धरणाचे बॅकवॉटरचे पाणी, महाराष्ट्र सीमेवरील उमरी, धर्माबाद, आणि नायगाव तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या शेतात घुसत असते. अतिवृष्टीच्या काळात पूर परिस्थितीने संपूर्ण शेती जलमय होऊन हातातोंडाशी आलेले पीक मातीमोल होते. गोदातीरावर असलेल्या चारही तालुक्यातील शेतकऱ्यांचे, पूरग्रस्त परिस्थितीमुळे लाखो रुपयाचे नुकसान होत असते. या गंभीर परिस्थितीबद्दल तब्बल ४० वर्षापासून या भागातील शेतकरी शासनाकडे न्याय मागत आहेत. परंतु अजूनही शेतकऱ्यांना न्याय मिळाला नसल्यामुळे दिनांक २१ मे रोजी संपूर्ण शेतकऱ्यांच्या वतीने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोटारसायकल महामोर्चा काढण्यात आला.

महाराष्ट्र राज्यातून वाहत जाणाऱ्या गोदावरी नदीवर तेलंगणा राज्यात, पोचमपाड धरण बांधण्यात आले. धरणाचे अडवलेले बॅकवॉटरचे पाणी महाराष्ट्र राज्यातील उमरी, धर्माबाद आणि नायगाव तालुक्यातील गोदावरी नदीच्या तीरावर असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात घुसून दरवर्षी पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होते. परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. त्याबाबत शासनाकडे अनेक वेळा अर्ज विनंती करूनही तब्बल ४० वर्षांपासूनची या भागातील शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे या भागातील नेते शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ. भगवान मनुरकर, उमरी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष कैलासराव देशमुख गोरठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोचमपाड बॅक वॉटर पूरग्रस्त शेतकऱ्यांना कोल्हापूर धरणग्रस्त शेतकऱ्यांना लागू असलेला शासन निर्णय येथील शेतकऱ्यांनाही लागू करावा, सर्व पूरग्रस्त शेतकऱ्यांना धरणग्रस्त प्रमाणपत्र प्रदान करावे, पिकविमा न भरणे झालेल्या शेतकऱ्यांना पेरणीपूर्व हेक्टरी २५ हजार रुपये तात्काळ बँक खात्यात जमा करावे, पूर्वाधित गावांचे वेगळे महसूल मंडळ स्थापन करावे, पूरग्रस्त शेतकऱ्यांना, पीक कापणी प्रयोगाची अट रद्द करून महसूलच्या पंचनाम्यानुसार १०० टक्के टक्के पिकविमा मंजूर करावा, आणि वाढलेल्या खताच्या किंमती तात्काळ कमी कराव्यात. इत्यादी मागण्या संदर्भात भव्य मोटारसायकल महामोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

# अखेर उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय नांदेड येथेच!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे -**

आदिवासी, भौगोलिक, नैसर्गिक साधनांच्या योग्य वापरासाठी, कार्यक्षम प्रशासनाला सुशासनासाठी व महसूल आयुक्तालयासाठी नांदेड येथे भूमी अभिलेख कार्यालयाचे उपसंचालक कार्यालय होणे आवश्यक आहे, अशी भूमिका राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, नांदेड जिल्ह्यातील चौथ्यास्तंभाने तसेच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. श्रीजयाताई चव्हाण व जिल्ह्यातील तसेच हिंगोली जिल्ह्यातील सर्व आमदारांनी तसेच मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व शासनाकडे केली होती. याबाबतीमध्ये प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी नांदेड येथे हिंगोली जिल्ह्यासाठी, आदिवासी व भौगोलिकदृष्ट्या उपसंचालक कार्यालय नांदेड येथे होणे विकासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे, याबाबत जागृती निर्माण केली. हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील सर्व आमदार लोकप्रतिनिधींनी यासाठी पाठपुरावा केला, त्यामुळे नांदेड येथे उपसंचालक कार्यालय होणार आहे आणि त्याबाबत आकृतीबंध तयार झालेला आहे.

वास्तविक भूमी अभिलेख कार्यालय उपसंचालक हे लातूरला व्हावं, अशा प्रकारचं भूमी अभिलेख प्रशासनाने प्रस्तावित केले होते, परंतु नांदेडकर भूमिपुत्रांनी ते कार्यालय नांदेड येथे होणे सुशासनासाठी, कार्यक्षम प्रशासनासाठी व भौगोलिकदृष्ट्या विचार करून नांदेडला होणे व नांदेडच्या सर्वांगीण विकासासाठी आयुक्तालय होण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे याची जाणीव प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांना झाली होती. त्या दृष्टिकोनातून नांदेड येथील सर्व लोकप्रतिनिधी व जागरूक नागरिकांमध्ये जागृती करण्याचे कार्य व शासनाकडे या मागणीचा पाठपुरावा करण्याबाबत चौथ्यास्तंभाने महत्त्वाची भूमिका पार पाडली आणि त्यामुळे नांदेड येथे उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय होणार आहे.

भविष्यात नांदेड येथे विभागीय महसूल आयुक्तालय कार्यालय निर्माण करून मराठवाड्याचा अनुशेषग्रस्त आदिवासी व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या नांदेड जिल्ह्याला त्यामुळे गती मिळणार आहे.

नांदेड येथे विभागीय भूमिअभिलेख उपसंचालक कार्यालय होणे हे हिंगोली जिल्ह्यासाठी व आदिवासी असणाऱ्या किनवट तालुक्यासाठी अत्यंत सोयीचे आहे आणि विकासाला चालना देणारे आहे याबाबत चौथ्यास्तंभाने वेळोवेळी नांदेडचे उपसंचालक कार्यालयाबाबत शासनाकडे बातम्यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला आहे.

# मारोती डुबूकवाड यांच्या साखळी उपोषणास प्रहार संघटनेचा पाठिंबा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २१ मे -**

शहरातील रेल्वे गेट येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाच्या उभारणीसाठी सामाजीक कार्यकर्ते मारूती डुबुकवाड यांच्या दि. १२ में पासुन सुरू असलेल्या साखळी उपोषणास प्रहार दिव्यांग क्रांती संघटना मुदखेड तालुका आणि शहर दिव्यांग संघटनेर्ते जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातुन देशातील सर्व घटकांना सामाजिक न्याय समता आणि बंधुत्वतेचा संदेश दिला त्यांच्या विचाराचा वारसा जतन करण्यासाठी संबंधित ठिकाणी त्यांच्या पुर्णकृतीपुतळा उभारणे ही जनतेची रास्त मागणी आहे. स्थानिक प्रशासनाने सुध्दा आपली रास्त व न्याय मागणी मान्य करत सकारात्मक दृष्टिकोनातुन




योग्य निर्णय घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा नियोजन मुदखेड ठिकाणी उभारणी करण्यासाठी पाठपुरावा करावे असे प्रहार संघटनेच्या पत्रात नमूद केले आहे.

यावेळी ता. महिला अध्यक्षा सौ. केशरताई पा. शिंदे, मा.ता. प्रमुख अनिल पा. शेटे, गोविंद लोणे, शंकर पा. शिंदे, साहेबराव निवडंगे, अहमद शेख, माधव पांचाळ, यासह आदिं प्रहार सेवक यांची उपस्थिती होती.

# निवडणुकीच्या अनुषंगाने विभाग प्रमुखांची बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे -**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्व विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आज सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विधानपरिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील एकूण ८ मतदान केंद्रांवर १८जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

दुष्काळ, पाणीटंचाई, नैसर्गिक आपत्ती यासारखी परिस्थिती वगळता आचारसंहिता कालावधीत विविध योजनांच्या शासकीय व नवीन जाहिराती देता येणार नाहीत. तसेच नवीन मान्यता, शासकीय कामांचे उद्घाटने करता येणार नाहीत. ग्रामसभेसह कोणत्याही कार्यालयात शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती राजकीय बैठका घेण्यासही मनाई आहे. मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही काम या कालावधीत करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. याशिवाय शासकीय कार्यालयांमध्ये कोणत्याही योजना किंवा राजकीय व्यक्तींची छायाचित्रे ठेवू नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. या आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन त्यांनी सर्व संबंधितांना केले.

निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची माहिती उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी यावेळी दिली. मुक्त व निर्भय वातावरणात निवडणूक पार पडावी, तसेच मतदारांवर कोणताही प्रभाव पडणार नाही यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी प्रास्ताविकात निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका न झाल्यामुळे त्यांचे सदस्य मतदार राहणार नसल्याची माहितीही त्यांनी दिली.

याबैठकीपुर्वी निवडणूकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसोबत बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदान प्रक्रिया, प्रचारासंदर्भातील नियम, परवानग्या तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

## उमरी मॉडर्न इंग्लीश स्कुलची दरवर्षी रेकॉर्ड ब्रेक कामगीरी

**नांदेड** - उमरी मॉर्डन इंग्लीश स्कुलने शैक्षणिक गुणवता , सामाजिक उपक्रमात नंबर वन येवून अनेक शैक्षणिक क्षेत्रात उमरी शहरात व विभागात बाजी मारली असून विशेष म्हणजे मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात ही उमरी शहरात नंबर १ वन चे पारिषोतक पटकविले आहेत दुसऱ्यांदा ही बक्षीस प्राप्त केले आहे . सध्या महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांचे मार्फत माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी आणि ८ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेचे निकाल जाहिर झाले असून मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय उमरी चे एकुण २१ विद्यार्थ्यांनी शिष्यवृती परिक्षेत यशस्वी उत्कुंग भरारी घेतली आहे असून त्यामध्ये इयत्ता ५ वीचे ९ विद्यार्थी आणि इयत्ता ८ वीचे १२ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शिष्यवृत्ती परिक्षेतील इयत्ता ५ वीचे पात्र विद्यार्थी अभिमन्यू गाडेवाड, आदित्य अवधूतवार, अमेय मुक्कावार, अर्पीता कुसूमकर, चैतन्य खांडरे, पुर्वी संगनवार, सुघोष देशपांडे,.वेदांत मंत्रीवाड ,युवराज वानखेडे, इयत्ता ८ वीचे पात्र विद्यार्थी अमन तिवारी , आराध्या मराठे, आराध्या चव्हाण, भक्ती रत्नपारखे, दिव्या ढगे, दुर्गायणी केते, गौरव जलिलवाड, ओवी पबितवार, प्रणव ढेरे, राजविर पुरोहित, श्रीनिधी पबितवार, सुखदा जोशी, ह्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश संपादन करुन मॉडर्नची यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी, संस्थेच्या सर्व संचालक मंडळ आणि शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## भोकर तालूक्यातील शेतकऱ्यांना पिक विमा द्या : बिल्लेवाड

**नांदेड** -मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टिने भोकर तालूक्यातील पाच मंडळातील शेतीतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान झाले यामूळे शेतकरी अर्थिक संकटात सापडला होता या पाच मंडळापैकी मातूळ मोघाळी या दोन मंडळाला पिक विमा मंजूर झाला पण भोकर भोसी व किनी या मंडळात मोठ्या प्रमाणात नूकसान होवूनही पिकविमा मंजूर झाला नाही सदरील तीन मंडळातील शेतकऱ्यांना पिकविमा मंजूर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालूकाध्यक्ष सूरेश बिल्लेवाड यांनी केली आहे.भोकर भोसी किनी या तीन मंडळातील १५१९९ पिकविमाधारक असून २०.३४ कोटी पिकविम्यापासून शेतकरी वंचित राहिले आहेत भोकर तालूक्यातील सर्व मंडळात अतिवृष्टिने मोठ्या प्रमाणात नूकसान झालेले असताना भोकर भोसी व किनी या तीन मंडळातील शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.हि बाब शेतकऱ्यांना वेदना देणारी आहे.सदरिल मंडळातील शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालूका अध्यक्ष सूरेशभाऊ बिल्लेवाड यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## डॉ. सुरेश सावंत यांना पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग. ह. पाटील पुरस्कार

**नांदेड** -ज्येष्ठ बालसाहित्यकार तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांना पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचा डॉ. मंदा खांडगे पुरस्कृत ग. ह. पाटील पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्येष्ठ कवी तथा शिक्षणतज्ज्ञ ग. ह. पाटील यांच्या स्मरणार्थ दरवर्षी एका ज्येष्ठ साहित्यिकाला बालसाहित्यातील अनमोल योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. येत्या २६ मे रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित एका विशेष समारंभात डॉ. सावंत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.
डॉ. सावंत यांची आजवर ६० पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ३५ पुस्तके बालसाहित्याची आहेत. त्यांना साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह महाराष्ट्र शासनाचे तीन पुरस्कार आणि अन्य प्रतिष्ठित साहित्यसंस्थांचे ४५ पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षणक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेचा नरहर कुरुंदकर पुरस्कार आणि दै. सत्यप्रभाचा सौ. कुसुमताई शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला आहे. पुणे येथील अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. सावंत यांचे साहित्य शालेय तसेच विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट झाले आहे. त्यांच्या एकूण बालकवितेवर संशोधन करून एका विद्यार्थ्याने एम. फिल. ही पदवी संपादन केली आहे. अनेक विद्यापीठांत त्यांच्या बालसाहित्यावर संशोधन होत आहे. डॉ. सावंत यांनी कुंटूर, जळगाव आणि पैठण येथे संपन्न झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनांचे, तसेच पळसप (जि. धाराशिव) येथे झालेल्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. डॉ. सावंत यांनी १४५ पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत किंवा पाठराखण केली आहे. अलीकडेच त्यांच्या साहित्याविषयी राजगुरुनगर येथील प्राचार्य साईनाथ पाचारणे यांनी 'डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा' हा ग्रंथ लिहिला आहे.

# भाजप युवा मोर्चा नांदेड महानगरची नूतन जम्बो कार्यकारणी जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे -**

भारतीय जनता पार्टी महानगर नांदेड अंतर्गत 'युवा मोर्चा'ची वर्ष २०२६ ची अधिकृत जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. भाजपचे महानगरजिल्हाध्यक्ष माजी. आ. अमरनाथ राजूरकर आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत पा. क्षीरसागर यांच्या स्वाक्षरीने ही अधिकृत यादी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. आगामी काळातील संघटनात्मक बांधणी आणि युवकांचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी या कार्यकारणीची घोषणा करण्यात आली आहे.

नव्या कार्यकारणीमध्ये युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी शशिकांत क्षीरसागर असून, त्यांच्यासोबत सरचिटणीस, उपाध्यक्ष आणि चिटणीस पदांवर जिल्ह्यातील कार्यतत्पर युवा चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिकृत यादीनुसार नूतन पदाधिकारी खालीलप्रमाणे आहेत.यात सरचिटणीसपदी ओम बंडेवार,प्रियेश ठाकूर, करन चव्हाण, शिवा लोट, उपाध्यक्षपदी विशाल संपतवार, अक्षय पवार, शुभम खोडके, मारोती जाधव,माधव शिरसाठ,बालाजी काळे, निखील पुरी, सुजलसिंग फौजी, बालाजी बोकारे, आसिफ शेख, बलदीप यादव, प्रताप पाटील, पवीतसिंग आरतीया, किरण पारधे, पार्थ देशमुख, अध्ययन तेहरा, अर्चितसिंग चौधरी, सुशील यादव, विजय यादव, विक्रांत पार्डीकर, चिटणीसपदी मोहसीन शेख, अर्जुन कोकाटे, गजानन कदम, बालाजी गंजेवार, युवराज शिंदे, विशाल गिरी, प्रेम वीर, अभिनव कुलकर्णी, लखन उमरीकर, पार्थ शर्मा, प्रथमेश चौधरी, सचिन नरंगले, बालाजी गंजेवार, सतीश हातागळे, शिवा धुमाळ, शिवा कांबळे, शुभम महाजन, तानाजी चव्हाण, महेश कुलकर्णी, अजय यादव, प्रदीप मस्के, संतोष कोकाटे, लेखराज शिंगणकर आदींची नविन कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे

# मंजूर असलेला विमा रक्कम शेतकऱ्याच्या खात्यावर तात्काळ जमा करा : परमेश्वर जाधव

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. २१ मे -**

तालुक्यातील पाच कृषी मंडळांतील शेतकऱ्यांना मंजूर विमा रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उपविभागीय अधिकारी श्री विलास नरवटे यांना निवेदन देण्यात आले. कंधार तालुक्यातील पाच कृषी मंडळातील मंजूर झालेला विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करून आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव यांनी निवेदनातून केली आहे.

खरिप हंगाम तोंडावर आला असताना तालुक्यातील शेतकरी विविध संकटांच्या विळख्यात सापडला आहे. वाढती तीव्र उष्णता, पाणीटंचाई, खत, बियाणे, कीटकनाशके तसेच मशागतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे. आगामी खरिप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत




असताना शासनाकडून मंजूर झालेली पीक विमा रक्कम अद्याप अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

शिवसेना कंधार तालुक्याच्या वतीने मा. उपविभागीय अधिकारी, कंधार यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तालुक्यातील सात कृषी मंडळांपैकी बारुळ व पेठवडज या दोन मंडळांतील शेतकऱ्यांच्या खात्यावर विमा रक्कम जमा झाली आहे. मात्र कंधार, कुरुळा, दिग्रस, फुलवळ आणि उस्माननगर या पाच कृषी मंडळांतील शेतकऱ्यांना मंजूर विमा मिळालेला नाही.

शासनाच्या दिरंगाईमुळे आधीच नैसर्गिक संकटांना सामोरे जाणारा शेतकरी दुहेरी संकटात सापडला असून, तात्काळ विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, विधानसभा संघटक गणेश कुंटेवार, तालुका संघटक पंडित देवकांबळे, समन्वयक दादाराव पाटील शिंदे, शहर प्रमुख अतुल पापिनवार, उपतालुका प्रमुख विश्वनाथ पवार, संतोष घोरबांड, शिवदूत व्यंकट सोनटक्के, किसान सेना तालुकाप्रमुख शिवाजी पाटील कदम, चेअरमन जी. एम. पवळे, सर्कल प्रमुख तथा सरपंच आत्माराम पाटील लाडेकर, रावसाहेब दुधकवडे, रमेश देशमुख, गणेश धानोरकर आदी उपस्थित होते.

## 'कॉपी रॅकेट'ची सीबीआय चौकशी करा

**नांदेड, दि. २१ मे -**

सध्या सुरू असलेल्या 'नीट' पेपरफुटीच्या सीबीआय चौकशीची व्याप्ती वाढवून, जिल्ह्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षा केंद्रांवर चालणाऱ्या 'कॉपी रॅकेट'चीही सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाचे नांदेड महानगर अध्यक्ष शशिकांत क्षीरसागर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सीबीआयच्या नवी दिल्ली येथील संचालकांकडे तक्रार केली असून, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारावर कडक कारवाईची मागणी केली आहे.

# राज्य परीवहन महामंडळची 'एसटी संगे तिर्थाटन योजना'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड आगाराच्या वतीने अधिक मासनिमित्त एसटी संगे तिर्थाटन योजना सुरु करण्यात आली असून, या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आगार व्यवस्थापक दिग्वीजय नरंगले यांनी केले आहे.

दि.१५ जूनपर्यंत हि योजना सुरु




राहणार असून, पंढरपूर, तुळजापूर, आळंदी, माहूर, औंढा नागनाथ, शेगाव आदीसह अनेक तिर्थक्षेत्रांना भेटी देण्यात येणार आहेत. या योजनेत थेट तिर्थक्षेत्रापर्यंत बस सुविधा ज्येष्ठ नागरिक, महिला व सर्व प्रवाशांसाठी उपयुक्त सेवा तसेच सर्व सवलतीसह प्रवाशांना सवलत लाभ मिळणार आहे. ४० प्रवाशांचा समुह तयार झाल्यास संपर्क साधुन या योजनेचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आगार व्यवस्थापक दिग्विजय नरंगले, सहायक वाहतूक निरीक्षक यासीन खान यांनी केले आहे.

# बौद्ध भिक्षूंशिवाय धम्मप्रसार शक्य नाही : डॉ. गगन मलिक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे -**

भारतात बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसारात बौद्ध भिक्षूंचे कार्य अतुलनीय आहे. ते नेहमी मार्गदर्शकाच्या भूमिकेत असतात. बौद्ध उपासक आणि उपासिका यांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. बौद्ध विहारात बौद्ध भिक्षूंना असणारे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तेव्हा सर्वांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, बौद्ध भिक्षूंशिवाय धम्मप्रसार शक्य नाही, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अभिनेते तथा धम्म प्रसारक डॉ. गगन मलिक यांनी केले. ते तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. त्यांनी यावेळी जयभीम ची व्याख्याही सांगितली.

यावेळी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक, भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धर्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो, सचिव भंते शिलरत्न यांच्यासह श्रामणेर भिक्खू संघ, उद्घाटक पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, प्रमुख अतिथी डॉ. मायकेल ले ( जर्मनी), डॉ. क्वेन थेंग( जर्मनी), रिपब्लिकन हक्क परिषदेचे रमेशदादा सोनाळे, रिपब्लिकन नेते बापुराव गजभारे, आंबेडकरवादी मिशनचे दीपक कदम, रिपब्लिकन सेनेचे माधवदादा जमदाडे, बहुजन संघर्ष सेनेचे सुखदेव चिखलीकर, डॉ. सिद्धार्थ हत्तीआंबीरे, राष्ट्रीय प्रबोधनकार राहुल दादा अनविकर, कॉ. गणेश शिंगे, इंजी. भारत कानिंदे, माजी उप प्राचार्य साहेबराव इंगोले सर, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, एस. एन. गोडबोले, हौसाजी वारघडे, गणपत गायकवाड, सुरेश गजभारे, पीआय धबडगे, तोलाजी अटकोरे, मनिष कावळे, कुलदीप राक्षसमारे, सत्यपाल सावंत, आतिश ढगे, राजेशश्वर पालमकर, एस. एन. गोडबोले, सिद्धार्थ थोरात, अशोक धुतराज, प्रा. पंडित सोनाळे, रवी सरोदे, रणजित गोणारकर आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात बुद्ध पोर्णिमेच्या अनुषंगाने भव्य कार्यक्रम घेण्यात आला. तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले. सकाळपासूनच विविध धार्मिक विधी संपन्न झाल्या. अनेकांनी श्रामणेर दीक्षाभूमी बांधकामासाठी दान पारमिता केली. डॉ. गगन मलिक यांनी थायलंड बनावटीच्या ५० बुद्ध मूर्ती येथील दानशूर उपासक उपासकांना भेट दिल्या. यावेळी पुस्तक प्रकाशन आणि भित्तीचित्रे प्रकाशन कार्यक्रम संपन्न झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची उपस्थिती होती. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पीआय तांबे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

**आंबेडकरी समाजाचा समन्वय आवश्यक : अबिनाश कुमार**

तथागत गौतम बुद्ध यांनी करुणा, समता, बंधुता, अहिंसा, प्रज्ञा यांची शिकवण दिली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाच विचार पुढे नेत सामाजिक परिवर्तनासाठी बळ दिले. पोलीस प्रशासनाला समाजात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था आवश्यक असते. परंतु पोलिसांची ही भूमिका पुरेशी नसते. समाजानेही पुढे येणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या विधायक कार्यक्रमांत समाजात एकता, सौहार्द, बंधूंभाव अधिक दृढ होतो. यासाठी आपण एकमेकांत समन्वय साधला पाहिजे. यामुळे देशपातळीवर प्रश्न सुटू शकतात, असेही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार म्हणाले. आज भदंत ज्ञानज्योती महाथेरो यांची धम्मदेसना संपन्न होणार असून आजही सकाळी १०.०० वा. उपस्थित रहावे, असे आवाहन भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हनुमान व्यायाम शिबिरात मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**परळी वैजनाथ |** येथे हनुमान व्यायाम शाळा अंतर्गत आयोजित हनुमान व्यायाम शिबिर तथा संस्कार वर्गामध्ये विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर बुधवार दि. 20 मे 2026 रोजी उत्साहात संपन्न झाले.

या शिबिरामध्ये प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. गुरुप्रसाद देशपांडे, डॉ. अंकुश जबदे, आयुर्वेद तज्ञ डॉ. रविंद्र ईटके, व स्त्रीरोग तज्ञ डॉ. सौ. मृदुला जबदे या मान्यवर डॉक्टरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरामध्ये पोटदुखी, डोकेदुखी, खोकला, दमा, पाळीच्या तक्रारी या आजारावर उपचार करण्यात आले. तसेच उंची वाढवण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य तपासणी यशस्वी होण्यासाठी शिबीर मार्गदर्शक दत्तापा ईटके गुरुजी, अध्यक्ष वैजनाथ ईटके, यावेळी शिबिर प्रमुख श्री सुभाष नाणेकर, सुरेश टाक ले अमर देशमुख सर विलास आरगडेसर प्राचार्य अतुल दुबे उमेश चौंडे बाळासाहेब हंगरगे विजय मुंडे सर शिवशंकर कराड एडवोकेट सायन्स मुंडे महादेव फड अमित कचरे महात्मा हत्ती महात्मा हत्ते अतुल नरवाडकर दत्तराव नागापुरे ज्ञानोबा मुंडे हरिभाऊ बनसोडे चंद्रकांत चाटे सोमेंद्र शास्त्री विक्रम स्वामी अजय राऊत राहुल तिडके अनिकेत तीळकरी नंदकिशोर पुजारी जगन्नाथ रामदासी यश गायकवाड कार्तिक भारती प्रशांत साखरे विश्वजीत मुंडे रणवीर गायकवाड कृष्णा बागवाले कार्तिक गायकवाड धनराज पवार अवधूत अयचित शिवम गरजे किशोर पवार कपिल चौधरी सौ वीरश्री आर्या एडवोकेट सानिया फड सो गौरी ईटके अस्मिता कावरे आरती धुमाळ प्रणिता चाटे स्वाती वाघमारे संस्कृती संगई संध्या नाईकवाडे गौरी नागराळे सुनिता सावजी भार्गवी पाठक संस्कृती मुंडे प्रतीक्षा डुबे परिघा तिवारी प्रतीक्षा कस्तुरे आदी उपस्थित होते तसेच शिबिरातील अनुभवी क्रीडा शिक्षक तसेच सर्व प्रशिक्षक सह प्रशिक्षक व शिक्षिका सहप्रशिक्षिका या सर्वांनी परिश्रम घेतले.

तसेच

### अंबाजोगाईचे दोन विद्यार्थी लातूरमध्ये NEET ची तयारी करायचे, आता CBI कडून चौकशी

# लातूरमध्ये राहून NEET परिक्षेची तयारी करणाऱ्या अंबाजोगाईतील दोन विद्यार्थ्यांना सीबीआयने चौकशीसाठी घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई |** देशभरात प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या NEET (वैद्यकीय पात्रता परीक्षा) पेपर फुटी प्रकरणाचे धागेदोरे आता बीड शहरासह अंबाजोगाईत पोहोचले असून,या हायप्रोफाईल प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) आज अंबाजोगाईत धडक कारवाई केली. सीबीआयच्या पथकाने शहरातील दोन संशयित विद्यार्थ्यांची तब्बल दोन तास कसून चौकशी केल्याने संपूर्ण जिल्ह्यात आणि शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन एका अज्ञात ठिकाणी चौकशी**

मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे विशेष तपास पथक आज, 21 मे रोजी सकाळीच अत्यंत गुप्तपणे अंबाजोगाई शहरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांनाही फारशी कल्पना न देता सीबीआयने थेट संशयित विद्यार्थ्यांचा शोध घेत कारवाई सुरू केली. या पथकाने दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन एका अज्ञात ठिकाणी त्यांची दोन तास कसून चौकशी केली आहे.



**विद्यार्थ्यांचे मोबाईल फोन आणि मेमरी कार्ड घेतले ताब्यात घेतले**

चौकशी दरम्यान तपास यंत्रणेने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलत अंबाजोगाईतील दोन्ही विद्यार्थ्यांचे मोबाईल फोन आणि मेमरी कार्ड आपल्या ताब्यात घेतले आहेत. हे दोन्ही विद्यार्थी लातूर येथे राहून वैद्यकीय परीक्षेचे (NEET) तयारी करत होते, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. लातूर हे महाराष्ट्रातील कोचिंग क्लासेसचे मुख्य केंद्र असल्याने, या प्रकरणाचे धागेदोरे आता लातूरमधील मोठ्या रॅकेटशी जोडले गेले आहेत का? याद्दष्टीने तपास सुरू झाला आहे.

अंबाजोगाईतील या दोन्ही संशयित विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वीच गैरमार्गाने किंवा आर्थिक देवाणघेवाण करून NEET पेपर मिळवला असल्याचा दाट संशय सीबीआयला आहे .जे ताब्यात घेतलेल्या मोबाईल आणि मेमरी कार्डमधील डिजिटल डेटा, चॅट्स आणि कॉल्सच्या माध्यमातून या संशयाची शहानिशा केली जात आहे.

दरम्यान बीड आणि लातूर जिल्हा आधीच नीट प्रकरणातील काही संशयितांच्या अटकेमुळे चर्चेत आहे. आता थेट अंबाजोगाईत सीबीआयने पाऊल ठेवल्यामुळे या रॅकेटची पाळेमुळे मराठवाड्यात किती खोलवर रुजली आहेत, हे स्पष्ट होत आहे. आजच्या या मॅरेथॉन चौकशीतून आणि जप्त केलेल्या मोबाईलच्या फॉरेन्सिक डेटावरून आता नेमका कोणता मोठा खुलासा समोर येतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या स्थानिक विकास निधीतून लिंगायत स्मशानभूमीच्या वाढीव संरक्षण भिंतीचे काम वेगात



परळी वैजनाथ : पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आमदार फंडातून होत असलेल्या लिंगायत समाज स्मशानभूमीला वाढीव संरक्षण भिंत (रिटेनिंग वॉल) बांधण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून ते अंतिम टप्प्यात आले आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आमदार फंडातून या कामासाठी निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे लिंगायत समाजाची अनेक वर्षांची अडचण दूर झाली आहे.

या स्मशानभूमीच्या परिसरामध्ये विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे मोठ्या प्रमाणात माती खाली येत होती. पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर होत असे. माती सातत्याने खचत असल्याने स्मशानभूमीच्या अंतर्गत संरचनेला आणि भिंतीला धोका निर्माण झाला होता. अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांनाही यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. ही अडचण दूर करण्यासाठी येथे मजबूत वाढीव संरक्षण भिंत असणे अत्यंत गरजेचे होते. पूर्वीच्या भिंतीच्या वर माती गेल्याने माती बाहेर पडू लागली होती.

स्मशानभूमीची दुरवस्था आणि बाहेर पडणारी माती पाहता, अश्विन मोगरकर यांनी लिंगायत समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना घेऊन ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन ही समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. समाजाच्या वतीने या ठिकाणी तातडीने वाढीव संरक्षण भिंत बांधण्याची आग्रही मागणी करण्यात आली होती. नागरिकांच्या भावना आणि अडचण लक्षात घेऊन ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून या कामाला तत्परतेने मंजुरी दिली. सध्या स्मशानभूमी परिसरात मजबूत पद्धतीने संरक्षण भिंत बांधण्याचे काम वेगाने सुरू आहे. हे काम प्रगतीपथावर असल्याने आता माती खाली येण्याचा धोका पूर्णपणे टळणार आहे. पंकजाताई मुंडे यांनी तातडीने दखल घेतल्याबद्दल परळीतील लिंगायत समाजाच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानले जात असून, या कामामुळे समाजात समाधानाचे वातावरण आहे.

# अत्यंत दुर्मिळ “संत जगमित्रनागा अभंग गाथा” प्रकाशनाच्या उंबरठ्यावर!

## प्रकाशनपूर्व नोंदणीस भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**परळी वैजनाथ |** संत साहित्यप्रेमी, वारकरी, कीर्तनकार आणि अध्यात्मिक अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी “अत्यंत दुर्मिळ संत जगमित्रनागा अभंग गाथा” ही ग्रंथसंपदा आता प्रकाशनाच्या उंबरठ्यावर आली असून प्रकाशनपूर्व नोंदणीला सुरुवात करण्यात आली आहे. अवघ्या ४० रुपयांत उपलब्ध होणाऱ्या या गाथेसाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या गाथेमध्ये संत जगमित्रनागा यांच्या दुर्मिळ अभंगांसह त्यांचा भावार्थही समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायातील अभ्यासक, कीर्तनकार तसेच संत साहित्याची आवड असणाऱ्या भाविकांसाठी ही गाथा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. संत साहित्य क्षेत्रातील एकमेवाद्वितीय आणि दुर्मिळ मानली जाणारी ही अभंग गाथा अभ्यासकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

संत साहित्याचे अभ्यासक व साहित्यिक म्हणून परिचित असलेले ॲड. दत्तात्रेय आंधळे यांनी या ग्रंथाचे लेखन केले आहे. यापूर्वीही त्यांनी विविध चरित्रग्रंथ प्रकाशित केले असून त्यांच्या लेखनाला संत साहित्य क्षेत्रात विशेष मान्यता मिळाली आहे. परळी वैजनाथ येथील संत जगमित्र नागा यांच्या चरित्र, अभंग आणि अध्यात्मिक जीवनाचा फारसा प्रसार झालेला नसताना, त्यांचे कार्य आणि विचार व्यापक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न या ग्रंथातून करण्यात आला आहे. संत जगमित्रनागा यांच्या जीवनचरित्रासह त्यांच्या अभंगांचा अभ्यासपूर्ण आढावा या गाथेत घेण्यात आला असून भाविकांनी व संत साहित्य अभ्यासकांनी प्रकाशनपूर्व नोंदणी करून या उपक्रमास प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी सेवामूल्य केवळ ४० रु. आहे.......फोन पे क्रमांक : ९४२१३३७०५३यावरून आपण ग्रंथखरेदी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद दिनदयाळ बँकेचे सीईओ महेश शेळके सायकलवरून पोहोचले बँकेत

**तभा वृत्तसेवा**



**अंबाजोगाई |** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देत सायकल वापर वाढविण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या प्रेरणादायी संदेशाला प्रतिसाद देत अंबाजोगाई येथील दिनदयाळ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) महेश उत्तमराव शेळके यांनी आपल्या दैनंदिन कामासाठी सायकलचा वापर करत बँकेत उपस्थिती लावली.

महेश शेळके यांनी सायकलचा वापर करून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. वाढते प्रदूषण, इंधनाच्या वाढत्या किंमती आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने शक्य तितक्या प्रमाणात सायकलचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. “सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्य जपण्यासोबतच पर्यावरण संवर्धनासाठी प्रभावी माध्यम आहे,” असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यांच्या या उपक्रमाचे बँकेतील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांकडून स्वागत करण्यात आले. अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक करत इतरांनीही पर्यावरण रक्षणासाठी अशाच प्रकारे पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘फिट इंडिया’ आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या संदेशाला प्रतिसाद देत समाजातील विविध स्तरांतील नागरिक पुढे येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. महेश शेळके यांच्या या उपक्रमामुळे अंबाजोगाई शहरात सकारात्मक संदेश गेला असून युवकांमध्येही सायकल वापराबाबत जागृती निर्माण होत आहे.

पर्यावरण रक्षण, आरोग्य संवर्धन आणि इंधन बचतीसाठी सायकल संस्कृती रुजविणे ही काळाची गरज असून समाजाने यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# बालगृहातील मुलांना मारहाण प्रकरणी अधीक्षकावर गुन्हा दाखल?

## बीड बालसुधारगृहाच्या कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह?न्यायालयाच्या आदेशानंतर कारवाई

बीड(प्रतिनिधी)शासकीय निरीक्षण गृह (बालगृह) बीड येथील काही मुलांना मारहाण केल्याच्या गंभीर आरोपप्रकरणी महिला व बाल विकास विभागाच्या तत्कालीन अधीक्षकां विरोधात न्यायालयाने तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. या आदेशानंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून संबंधित विभागाकडून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची चर्चा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बालसुधारगृहात वास्तव्यास असलेल्या काही मुलांना मारहाण झाल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या होत्या. या संदर्भात चौकशीची मागणी करण्यात आली होती. प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने महिला व बाल विकास विभागाला संबंधितांवर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून बीड येथील बालगृहाच्या कारभाराबाबत विविध तक्रारी समोर येत होत्या. मुलांना दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. राहणीमान, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व झोपेची व्यवस्था, गाद्यांची अवस्था, पोषण आहार आणि देखरेखीच्या दर्जाबाबत नाराजी व्यक्त होत असल्याची माहिती काही स्तरावरून पुढे आली होती. यामुळे संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. बालहक्कांनुसार, संस्थेमध्ये राहणाऱ्या मुलांवर कोणत्याही प्रकारची शारीरिक किंवा मानसिक छळवणूक होऊ नये, याची जबाबदारी प्रशासनावर असते. अशा तक्रारी गंभीर स्वरूपाच्या मानल्या जातात.

या प्रकरणात न्यायालयीन आदेशानंतर पुढे कोणावर नेमकी जबाबदारी निश्चित होते आणि बालगृहातील कारभारात सुधारणा होते का, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मात्र, अधिकृत गुन्हा नोंद आणि संबंधित विभागाची अधिकृत भूमिका समोर येणे अद्याप बाकी आहे.



### बालसुधारगृहातील नियम व सुविधा काय असाव्यात?

भारतातील बालगृह व निरीक्षण गृह हे बालकांच्या संरक्षण, पुनर्वसन आणि सुधारणा यासाठी चालवले जातात. अशा ठिकाणी मुलांना शिक्षा देणे किंवा शारीरिक मारहाण करणे नियमबाह्य मानले जाते. बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी काही मूलभूत सुविधा देणे बंधनकारक असते, त्यामध्ये –

सुरक्षित व स्वच्छ निवास व्यवस्था:, स्वच्छ अंथरुण, गादी व कपड्यांची सुविधा:, पौष्टिक आहार व आरोग्य तपासणी:, शिक्षण, समुपदेशन व मानसिक आधार:, खेळ, मनोरंजन व व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम, बालकांशी सन्मानाने वागणूक आणि अत्याचारमुक्त वातावरण:

# हिंगणी खुर्द येथील पानंद रस्ते लवकरच होणार अतिक्रमणमुक्त!

**बीड |** तालुक्यातील हिंगणी खुर्द येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पानंद रस्त्यांचा प्रश्न अखेर मार्गी लागणार आहे. गुरुवारी (दि. २१) बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी जायभाय आणि तलाठी इनकर यांनी स्वतः गावात जाऊन या रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीअंती रस्त्यांवरील अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ते मोकळे करण्याचे आदेश तहसीलदार शेळके यांनी संबंधित प्रशासनाला दिले आहेत.

हिंगणी खुर्द हे गाव मांजरा नदीच्या काठावर वसलेले असल्याने येथे उसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शेतीमाल आणण्यासाठी आणि दळणवळणासाठी येथील शेतकऱ्यांना पानंद रस्त्यांचा वापर करावा लागतो. मात्र, अनेक ठिकाणी या रस्त्यांवर अतिक्रमणे झाल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. ही बाब गांभीर्याने घेत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गुरुवारी तब्बल दोन तास पायी चालत तुळजाभवानी मंदिर रस्ता, नागरगोजे वस्ती, आंधळे वस्ती आणि मुंडे वस्ती रस्त्यांची सविस्तर पाहणी केली.

# अंबाजोगाईतील कसबे परिवाराने जिवंत ठेवली 'कोनशिला'ची कला

अंबाजोगाई : आज देशात विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन अत्यंत वेगाने पुढे जात आहे. रोबोट तथा एआयच्या माध्यमातून शंभर हाताचे काम दहा हातावर आणले आहे. मात्र अशाही परिस्थितीत देशाचा सांस्कृतिक कणा काही मंडळींच्या वतीने जोपासला जात आहे. कसबे परिवार हे एक असेच नाव आहे की ज्यांच्याकडून दगडावर किंवा फरशीवर कोरीव काम करत हस्तलिखित शिल्पकलेचा अजोड नमुना हा जोपासला जात आहे. आजच्या डिजिटल युगात देखील कसबे यांच्या हस्तलिखित शिल्पकलेला जोरदार मागणी असून त्यावरून आजदेखील ही शिल्पकला आपले अस्तित्व टिकवून असल्याचे दिसून येत आहे.

नारायण (रमेश) वाल्मीक कसबे हे गेली ३५ ते ४० वर्षांपासून दगडावर किंवा फरशीवर नाव तथा नक्षीकाम कोरून आपला उदरनिर्वाह करित आहेत. त्यानी त्यार केलेल्या कोनशिला आजही शासकीय, निमशासकीय कार्यालय, शाळा व महाविद्यालय, मंदिर, घर त्याचबरोबर समाधी स्थळावर पहायला मिळत आहेत. त्यांनी तयार केलेल्या कोनशिलेमध्ये



छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवमुद्रा, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या भारताच्या संविधान प्रास्ताविका यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

नारायण कसबे यांनी कोणत्याही दगड किंवा फरशीवर छत्री व हातोडीच्या साह्याने कोरीव काम करून कोनशिला ज्या ठिकाणी लागणार आहे ते ठिकाण किंवा परिसर जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. त्यांनी आजपर्यंत जवळपास ७ ते ८ हजार हस्तलिखित कोरीव कोनशिला तयार करून त्यांच्या हस्तकलेचा तथा शिल्पकलेचा अजोड नमुना मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात देखील पोहचविला आहे. कसबे यांनी केवळ मराठी भाषेतच नाही तर हिंदी, इंग्रजी, उर्दू, त्याचबरोबर कानडी भाषेत देखील कोनशिला बनवण्याचे कसब अंगी बाळगले आहे. शिखर शिंगणापूर येथील ज्योतिर्लिंग मंदिराच्या ठिकाणी देखील नारायण कसबे यांनी तयार केलेली हस्तलिखित कोनशिला आपणास पहावयास मिळते. नारायण कसबे यांची कला पाहून त्यांच्या या हस्तकलेच्या सन्मान भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आला होता.

# जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांना पदोन्नती

**बीड |** बीड जिल्हा वाहतूक शाखेचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांना पदोन्नती मिळाली असून त्यांची आता नाशिक येथे आयुक्तलयात बदली झालेली असून त्यांच्यावर पोलीस विभागासह विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आपल्या शिस्तबद्ध कार्यपद्धती, उत्कृष्ट नियोजन आणि जनसामान्यांशी जपलेल्या समन्वयामुळे खेडकर यांनी अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण केली आहे. वाहतूक नियंत्रण, स्वतः नगरपालिकेचे सीओ फडसे यांना पत्र देवून अतिक्रमण हटाव मोहीम राबवणे, बुलेट सायलेन्सवर प्रतिबंध लावणे, अपघात प्रतिबंधक उपाययोजना राबवणे तसेच विशेष मोहिमांमध्ये त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यात वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्येही त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

### ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांना पितृशोक

# चंद्रसेन रंगनाथ तांदळे यांचे निधन

बीड (प्रतिनिधी) - ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांचे वडील भूविकास बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी चंद्रसेन रंगनाथराव तांदळे राहणार हिंगणी (खुर्द ), ता. जि. बीड हल्ली मुक्काम समता कॉलनी, मित्र नगर , के. एस. के. कॉलेज रोड, बीड. यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. बीड शहरातील मित्र नगर भागात राहणारे चंद्रसेन तांदळे गेल्या काही काळापासून वृद्धापकाळाने आजारी होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना आज दिनांक २१ मे २०२६ गुरुवार रोजी सकाळी ०७:०० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ०१:०० वाजता भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# अंबाजोगाईत 48 गुन्ह्यांतील तब्बल 2.26 लाखांचा अवैध दारू नष्ट



**मुंबई |** अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे येथे जप्त करण्यात आलेला अवैध दारूचा मुद्देमाल माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार नियमानुसार नष्ट करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे अवैध दारू विक्री, वाहतूक आणि साठवणूक करणाऱ्यांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली आहे. पोलीस ठाण्यात विविध कालावधीत दाखल झालेल्या दारूबंदी व संबंधित ४८ गुन्ह्यांमधील अंदाजे २ लाख २६ हजार २७५ रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. सदर कारवाई माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आली असून दारूबंदी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शासनाच्या एसओपीनुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली.

नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये विविध प्रकारच्या देशी व विदेशी मद्याच्या बाटल्या तसेच संबंधित साहित्याचा समावेश होता. मद्य बाटल्यांमधील दारू सुरक्षित पद्धतीने बाहेर काढून जमिनीत टाकून नष्ट करण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया पंचांसमक्ष आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पार पडली. विशेष म्हणजे, सन २०२५ मध्ये अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या वतीने अवैध दारूविरोधात तब्बल १२० कारवाया करण्यात आल्या होत्या. चालू वर्षातही अवैध दारूची वाहतूक, विक्री आणि साठवणूक करणाऱ्यांविरोधात सातत्याने कठोर कारवाई सुरू असून आगामी काळात ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई माननीय पोलीस अधीक्षक नवनीत सर, अपर पोलीस अधीक्षक चेतना मॅडम तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईवेळी पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे, पोलीस उपनिरीक्षक बालाजी फड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक केदार मॅडम, पोलीस हवालदार अमोल गायकवाड, बाबासाहेब पोटभरे, महिला पोलीस हवालदार शितल धायगुडे, पोलीस अंमलदार सुशांत गायकवाड, अमोल वावळे तसेच स्टेट एक्साइज विभागाचे निरीक्षक चौरे साहेब व त्यांची टीम उपस्थित होती. अवैध दारू वाहतूक व साठवणूक करणाऱ्यांविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. या कारवाईमुळे शहर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होणार असून अवैध धंद्यांना आळा बसण्यास सहाय्य मिळणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com